MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष पंचविसावे / अंक २ / फेब्रुवारी २०२४

## संपादकीय

### स्वाती पोर्टल : एक नवी आशा

भारतात महिलांची संख्या देशाच्या लोकसंख्येच्या सुमारे ५० टक्के आहे. परंतु विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रांत मात्र महिलांची संख्या फारच कमी आहे. एकतर फारच कमी मुली विज्ञान/ तंत्रज्ञान अभ्यासक्रमात प्रवेश घेतात. ज्या मुली या क्षेत्रात पदवी मिळवितात त्या, त्या क्षेत्रात राहातीलच असे नाही. त्यामुळे विज्ञान तंत्रज्ञानाशी जुळलेल्या व्यवसायात महिलांचे प्रमाण फारच कमी असते. ते वाढविण्याचे सतत प्रयत्न होत असतात. जागतिक स्तरावर 'गॅसॅट' (GASAT: Gender and Science and Technology) नावाची एक स्वयंसेवी संघटना या संदर्भात कार्य करीत आहे. मुलींना विज्ञान तंत्रज्ञानाच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न ही संघटना करते. याखेरीज जागतिक स्तरावर या बाबींची जाणीव विकसित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर मुली आणि महिला विज्ञान दिन (International Day for Women and Girls in Science) साजरा केला जातो. फेब्रुवारी महिन्याच्या ११ तारखेला जगभर हा दिवस साजरा करण्यात आला. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय दिनाचा विषय होता 'महिलांचे विज्ञानातील पुढारपण: शाश्वत विकासाचा नवा कालखंड' (Woman in Science Leadership: - New Era for Sustainability). वेगवेगळ्या देशांत या विषयावर साधकबाधक चर्चा करण्यात आली. भारतात देखील अनेक ठिकाणी हा विषय घेऊन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय महिला विज्ञान दिनाचे औचित्य साधून भारत सरकारने 'स्वाती' नावाच्या पोर्टलची सुरूवात केली आहे. Science for Women: - Technology Innovation या शब्दांची आद्याक्षरे घेऊन स्वाती (SWATI) असे सुटसुटीत नाव या पोर्टलला दिले आहे. या कामी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ प्लॅन्ट जिनोम रिसर्च (National Institute of Plant Genome Research) या संस्थेने पुढाकार घेतला. म्हणून पोर्टलचा पत्ता https://swati.nipgr.ac.in असा आहे. या पोर्टलचे औपचारिक उद्घाटन भारत सरकारचे वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजयकुमार सूद यांनी इंडियन नॅशनल सायन्स अॅकॅडेमी (INSA: Indian National Science Academy) मध्ये केले. या कार्यक्रमाचे प्रसारण इन्साच्या यूट्यूब चॅनलवर करण्यात आले होते. याप्रसंगी विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. विशेष हे की, त्यात महिला सदस्यांची उपस्थिती लक्षात घेण्यासारखी होती. त्यात टि आय एफ आरच्या प्राध्यापक

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

शोभना शर्मा, आय आय एस सी च्या वैज्ञानिक रोहिणी गोडबोले, डब्ल्यू एच ओच्या डॉ. सौम्या स्वामिनाथन, इस्रोच्या निगर शाजी यांचा समावेश होता. भारताचे प्रथितयश वैज्ञानिक प्राध्यापक सी. एन. आर. राव विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे बीजभाषण थर्ड वर्ल्ड ॲकॅडेमी ऑफ सायन्सचे अध्यक्ष प्राध्यापक क्वारिशा अब्दुल करीम यांनी दिले (Key note address by Prof. Quarraisa -bdul Karim, President, Third World Academy of Sciences).

स्वाती पोर्टलवर अनेक प्रकारची माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे. या पोर्टलवर या आधी ज्या महिलांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्य केले त्यांची माहिती दिली जाईल. त्याचबरोबर, ज्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे त्यांचीही माहिती दिली जाईल. सध्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांची देखील माहिती दिली जाईल. यातून विज्ञान आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींना प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा आहे. अशा मुलींनी आपल्या नावाची नोंदणी या पोर्टलवर करावी असे आवाहन करण्यात आले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कोणत्या संधी उपलब्ध आहेत यांची माहिती या पोर्टलवर नियमितपणे दिली जाणार आहे.

स्वाती पोर्टलच्या निर्मितीने अनेक आशा पल्लवित झाल्या आहेत. यातून तरुण मुलींना त्यांचे मार्गदर्शक (Role Model) मिळतील अशी अपेक्षा आहे. परंतु खरी समस्या वेगळीच आहे. ती आहे समाज जागृतीची. इच्छित उद्दीष्ट साध्य करण्यासाठी केवळ पोर्टलवर अवलंबून न राहता समाजाच्या विविध स्तरांवर कार्य करण्याची गरज आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानात महिलांचा सहभाग वाढवायचा असेल तर सामाजिक दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. बहुतेक आई-वडिलांना असे वाटते की, आपल्या मुलीने विज्ञान न निवडता कला किंवा वाणिज्य शाखा निवडावी. हा विचार जुन्या काळात योग्य असेलही, परंतु २१ व्या शतकात तो मुळीच योग्य नाही. आज आपले जीवन विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे चांगलेच प्रभावित झाले आहे. अशा परिस्थितीत विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कवाडे मुलींना बंद करणे चुकीचे आहे. त्यासाठी समाज प्रबोधन करणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. 'स्वाती पोर्टल'च्या निमित्ताने इंडियन नॅशनल ॲकॅडेमी याही बाबींकडे लक्ष देईल अशी अपेक्षा बाळगू या.

मुलींनी उच्च शिक्षणासाठी विज्ञान शाखा निवडावी असे वाटत असेल तर त्यांच्यात विज्ञानाची आवड बालपणीच निर्माण होईल असा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राथमिक स्तरापासून विज्ञान शिक्षण सुधारणे गरजेचे आहे. शिक्षकांनी विज्ञान प्रभावीपणे शिकवावे यासाठी त्यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण करावे लागेल. अनेक शाळांमध्ये विज्ञानाची सुसज्ज प्रयोगशाळा नाही. त्या विकसित कराव्या लागतील. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करावी लागेल. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या निमित्ताने या बाबी विचारात घेतल्या जातील अशी आशा बाळगू या. विज्ञान शिक्षण हे केवळ विज्ञाननिष्ठ व्यवसायात प्रवेश मिळविण्यासाठी उपयोगी ठरते असे नसून, ते व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वाचे कार्य करते. विज्ञान शिक्षणाने शिकणाऱ्या व्यक्तींत वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होतो. त्याचा जीवनाच्या अनेक क्षेत्रात पदोपदी उपयोग होतो. वैज्ञानिक साक्षरता ही काळाची गरज आहे. ती जर समाजात रुजायची असेल तर मुलींच्या विज्ञान शिक्षणाकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रासारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष पंचविसावे / अंक २ / फेब्रुवारी २०२४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | स्वामी दयानंद सरस्वती : एक उर्जस्वल व्यक्तिमत्त्व | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | भारतीय इतिहास लेखनाची अनोखी पद्धत | श्री. शैलेंद्र कवाडे | ८ |
| ४) | नारी शक्ती ते राष्ट्र शक्ती... | डॉ. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी | १० |
| ५) | अभिव्यक्ती स्वातंत्र्य की स्वैराचार? | डॉ. अपर्णा लळिंगकर | १२ |
| ६) | ऋतू कवितेचे - भाग १ | श्री. श्रीपाद जोशी | १५ |
| ७) | कविता कशी समजून घ्यावी? | डॉ. आनंद कुलकर्णी | १७ |
| ८) | ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत ग्राहकाचे अधिकार: | प्रा. विनोद एच वाघ | १९ |
| ९) | स्वामी विवेकानंद यांची १६१वी जयंती | संकेत कुलकर्णी | २२ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | २४ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे – ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२–२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/– चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# स्वामी दयानंद सरस्वती : एक उर्जस्वल व्यक्तिमत्त्व

*स्वामी दयानंद सरस्वती; आर्य समाजाचे संस्थापक, स्त्री-उद्धारक, दलितोद्धारक, वेदोद्धारक, राष्ट्रवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि महान तत्त्वज्ञ होते. त्यांच्या जन्मास या वर्षी २०० वर्षे होत आहेत. त्यानिमित्ताने श्री नरेंद्र गोळे यांनी केलेला त्यांचा हा अल्प परिचय - संपादक*



स्वामी दयानंद सरस्वती; आर्य समाजाचे संस्थापक, स्त्री-उद्धारक, दलितोद्धारक, वेदोद्धारक, राष्ट्रवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि महान तत्त्वज्ञ होते. त्यांचा जन्म २० सप्टेंबर १८२४ रोजी, काठेवाडमधील मोरवी राज्यातील, टंकारा या गावी झाला. मुलाचे नाव मूलशंकर उर्फ दयाराम असे ठेवण्यात आले. त्यांच्या वडिलांचे नाव करसनलालजी तिवारी होते, तर आईचे नाव होते अमृतबाई. वडील शिवभक्त होते. पिढीजात जमीनदार आणि सावकार होते. तहसीलदार होते. समाजात त्यांना बराच मान होता.

दयानंदांनी वयाच्या पाचव्या वर्षी संस्कृतच्या अभ्यासास सुरुवात केली. आठव्या वर्षी मुंज झाल्यावर त्यांनी वेदाध्ययनाचा प्रारंभ केला. वयाच्या १४-व्या वर्षी त्यांनी वेदाध्ययन पूर्ण केले. मुंजीनंतर त्यांनी शैव पंथाची दीक्षा घेतली होती. शिवरात्रीच्या दिवशी रात्री शिवमंदिरात जागरण करीत असताना, त्यांनी शिवाच्या पिंडीवर उंदीर फिरताना पाहिला आणि 'देव म्हणजे मूर्ती नाही', हे त्यांना उमजले. त्यांनी हा प्रश्न आपल्या वडिलांनाही विचारला, पण समाधानकारक उत्तर मिळाले नाही. धर्म आणि देव यांच्यासंबंधी विचारांना चालना मात्र मिळाली. त्यांनी वयाच्या अठराव्या वर्षी, त्यांची लहान बहीण व प्रेमळ चुलते यांचा मृत्यू पाहिला. मृत्यूच्या भीतीतून मुक्ती कशी मिळेल याचाच सतत विचार करू लागले. अनेकांना त्यांनी यासंबंधी प्रश्न विचारले. मात्र, 'योगाभ्यास केल्याशिवाय याचे उत्तर मिळणार नाही', हे स्वामी दयानंद सरस्वती यांच्या लक्षात आले. मुलाच्या मनात वेगळेच विचार चालले आहेत हे लक्षात येताच त्यांच्या वडिलांनी त्यांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला. परंतु स्वामी दयानंद सरस्वती यांना हे समजताच, १८४५ मध्ये त्यांनी सत्याच्या शोधार्थ गृहत्याग केला.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी मग सायला गावी ब्रह्मचर्याची शपथ घेऊन 'शुद्ध चैतन्य' हे नाव धारण केले. यानंतर त्यांनी सुमारे पंधरा वर्षे हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पर्यटन केले. अनेक संन्याशांची, ज्ञानी पुरुषांची त्यांनी भेट घेतली, तसेच अनेक शास्त्रांचे सखोल ज्ञान संपादन केले आणि ते त्यांनी तपासूनही पाहिले. तांत्रिक आचार, कर्मकांड, मूर्तिपूजा, अज्ञानमूलक धर्माचरण, अंधश्रद्धा इत्यादी अनेक गोष्टींचे त्यांनी बारकाईने अवलोकन केले. धार्मिक क्षेत्रातील गैरव्यवहार आणि भोंदुगिरी पाहून त्यांचे मन उद्विग्न झाले. १८४८ साली, वयाच्या २४-व्या वर्षी, स्वामी दयानंद सरस्वती यांनी, पूर्णानंद नावाच्या स्वामींकडून संन्यास घेतला आणि 'दयानंद सरस्वती' हे नाव धारण केले. १८५५ साली भारतभ्रमण करत असताना उखीमठाचे महंत होण्याबाबत विचारणा झाली होती. त्याकरता ते पात्र समजले गेले होते. मात्र त्यांनी त्यास नकार दिला.

१८६० साली मथुरेस अत्यंत चिकित्सक आणि ज्ञानी असलेल्या स्वामी विरजानंद या प्रज्ञाचक्षू (अंध असलेल्या) गुरूकडे ते पोहोचले होते. विरजानंदांजवळ स्वामी दयानंद सरस्वती हे तीन वर्षे राहिले. याच काळात विरजानंदांशी विचारविनिमय होऊन, त्यांच्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणेच्या विचारांचा पाया घातला गेला. पुढील अनेकविध सुधारकार्यांची मुहूर्तमेढही रोवली गेली. दयानंदानी मग पुन्हा भारतभर परिभ्रमण केले. त्यावेळी त्यांनी मूर्तिपूजा, रुढीप्रियता, जन्मसिद्ध जातीभेद, हिंसात्मक यज्ञ इत्यादी गोष्टींवर टीका करणारी अनेक व्याख्याने दिली. दयानंद हे केवळ संहिता ग्रंथानाच वेद मानत असत, कारण त्यामध्ये जन्मसिद्ध जातिभेदास आधार नव्हता. वेदांचा आधार घेऊन त्यांनी ते विचार मांडण्यास सुरुवात केली.

त्यांनी १८६७ साली कर्णवास येथे स्त्रियांना गायत्री मंत्र उपासनेची दीक्षा देऊन सन्मान दिला! याला सनातन्यांनी विरोध केला होता. त्यांनी १८६९ साली फरुखाबाद, उत्तरप्रदेश येथे पहिली संस्कृत पाठशाळा स्थापन केली. काशीला राजा ईश्वरीप्रसाद नारायणसिंह यांच्या अध्यक्षतेखाली, २७ शास्त्री पंडितांबरोबर, अस्खलित संस्कृत भाषेत, शास्त्रार्थ वादविवाद केला. यानंतर दयानंदानी प्रयाग, कलकत्ता, मुंबई, पुणे, इत्यादी ठिकाणी व्याख्याने देऊन, आपले नवे धर्मसुधारणेचे विचार प्रभावीपणे मांडले. त्यामुळे केशव चंद्रसेन, लोकहितवादी, न्या. रानडे यासारख्यांनी त्यांची स्तुती केली होती. १८७३ साली केशव चंद्रसेन यांनीच, त्यांना हिंदी भाषेतून आर्यसमाजाचा प्रचार करावा असे सुचवले होते. १८७५ साली मुंबई येथे आपल्या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी, त्यांनी १० एप्रिल रोजी 'आर्य समाजाची' विधिवत स्थापना केली. आपल्या वैदिक धर्मविचारांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी पुणे येथे (महात्मा फुलेंनी जिथे शाळा सुरू केली होती त्या) भिडे वाड्यात १५ व्याख्याने दिली. पुण्यात ते सुमारे अडीच महिने राहिले. अखेरीस स्वामींचा भव्य सत्कार करण्यात आला. मिरवणूक काढण्यात आलेली होती. त्यास महात्मा फुलेही उपस्थित होते. मग उत्तर प्रदेश, राजस्थान, पंजाब, बिहार, मध्यप्रदेश इत्यादी प्रांतात दौरे केले आणि हिंदी भाषेत व्याख्याने देऊन धर्मजागृती केली.

आर्य समाजाच्या प्रचारासाठी त्यांनी ग्रंथ लेखनास प्रारंभ केला. दयानंदांनी यजुर्वेद आणि ऋग्वेद यांवर संस्कृतात भाष्ये लिहिलेली आहेत. पण त्यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'सत्यार्थप्रकाश' हा आहे. यात त्यांनी वेदांतील ज्ञान-भांडार हिंदी भाषेतून लोकांसमोर मांडले आहे. पुढे सत्यार्थप्रकाश हा आर्य समाजाचा प्रमाण ग्रंथ समजला जाऊ लागला. याशिवाय दयानंदांनी 'संस्कारविधी, पंचमहायज्ञविधी, गोकरुणाविधी' इत्यादी ग्रंथ लिहून आपले विचार जनतेसमोर मांडले. त्यात त्यांनी शुद्ध वैदिक धर्माचे स्वरूप स्पष्ट केले, पाखंडी मतांचे खंडन केले. मूर्तीपूजेचा धिक्कार केला, 'स्त्रियांना आणि शूद्रांना वेद अध्ययनाचा अधिकार आहे' हे सिद्ध केले, स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले, जातीभेदावर टीका केली आणि ख्रिस्ती, इस्लाम, यहुदी इत्यादी धर्मांतील दोष उघड करून दाखविले.

१८७७ साली स्वामीजींनी डॉ. रहीमखान यांच्या हवेलीत लाहोर येथे आर्य समाजाची स्थापना केली. तेथेच डॉ. रहीमखान यांनी आर्यसमाजात प्रवेश केला. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज यातीलही कार्यकर्ते दयानंदाकडे आकृष्ट झाले. दयानंद यांनी आर्य समाजाचे संघटन अत्यंत चिकाटीने आणि प्रभावीपणे केले. आर्य समाजातर्फे त्यांनी वैदिक पाठशाळाही काढल्या होत्या. १८८० साली काशीमध्ये त्यांनी वैदिक साहित्य छापण्याकरता 'वैदिक मुद्रणालया'ची स्थापना केली. १८८२ साली उदयपूर येथे त्यांनी 'परोपकारिणी सभे'ची स्थापना केली आणि आपले 'अंतिम इच्छापत्र' अंमलात

आणण्याची जबाबदारी तिचेवर सुपूर्त केली. मुंबईत आर्यसमाजाचे भव्य अधिवेशन झाले.

जाती-पंथ-भाषा इत्यादी कोणतेही भेद लक्षात न घेता कोणालाही आर्य समाजाचे सदस्य होता येत होते. आर्य समाजाच्या सदस्यांसाठी नियम तयार केले गेले होते. प्रत्येक रविवारी सर्व सदस्यांनी एकत्र येऊन वेदाध्ययन करायचे. प्रत्येकाने रोज संध्या, होम, गायत्री जप व वेदपाठ या गोष्टी अवश्य करायच्या. या गोष्टी करण्यास पुरोहिताची आवश्यकता लागत नसे. ''ब्रह्मचर्य, सत्य, भक्ती इत्यादी गुण प्रत्येकाने आत्मसात केले पाहिजेत. सर्व सत्याचे मूळ परमेश्वर आहे. वेद हा सत्यमूलक ग्रंथ आहे याचा विचार करूनच धर्माचरण केले पाहिजे. सर्वांच्या उन्नतीसाठी झटले पाहिजे. हे विचार लक्षात घेऊन प्रत्येक आर्यसमाज सदस्यांनी वागले पाहिजे'' असे दयानंदांनी म्हटले होते.

दयानंद हे स्वतः शरीराने, मनाने दणकट असे होते. अत्यंत विरुद्ध वातावरणातही आपली मते मांडण्यात ते कधीही माघार घेत नसत. 'काशीत जाऊन मूर्तीपूजा सिद्ध करा, नाहीतर विश्वेश्वर यांची मूर्ती फोडून टाका' असे म्हणून, ते वादास उभे राहिले होते. अनेक संकटे आली तरी त्यांनी ती तेजस्वीपणे स्वीकारली आणि त्यावर मात केली होती. ख्रिस्ती, इस्लामी धर्माच्या पंडितांशी वाद घालून त्यांनी त्यांना परास्त केले होते. परधर्मात जाऊ पाहणाऱ्या हिंदूंना, वैदिक धर्म पटवून दिला होता. परधर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले होते. वैदिक धर्माला त्यांनी पुन्हा तेजस्वी बनविले होते. सहस्रावधी लोकांना आर्यसमाजाच्या कार्याकडे प्रवृत्त केले होते.

१८८३ साली दयानंद जोधपूरला आले. तेथील महाराज जसवंतसिंह यांची त्यांच्यावर श्रद्धा बसली आणि ते त्यांचे अनुयायी बनले होते. मात्र जसवंतसिंह अत्यंत विलासी, वेश्यागामी, मदिरासक्त आणि कर्तव्याबाबत बेफिकीर होते. स्वामी दयानंद आपल्या व्याख्यानांतून क्षत्रीय नरेशांच्या बदफैलीपणाबाबत प्रखर टीका करत असत. ती टीका न आवडून जसवंतसिंहांची रखेल नन्ही भगतन हिने कट करून, त्यांच्यावर विषप्रयोग करवला. विष प्रयोगामुळे दयानंद यांची प्रकृती बिघडली. अजमेर येथे ३० ऑक्टोबर १८८३ रोजी त्यांचे निधन झाले.

**स्वामी दयानंदांचे कार्य**

अलिगडचे डेप्युटी कलेक्टर राजा जय कृष्णदास हे स्वामीजींचे परमभक्त होते. ते आधुनिक विद्या विभूषित असल्यामुळे ग्रंथ लेखनाचे सामर्थ्य ते उत्तम प्रकारे जाणत होते. म्हणून त्यांनी स्वामीजींना अशी विनंती केली की, 'महाराज आपले विचार असे वाऱ्यावर उडून जाता कामा नयेत. त्यांना ग्रंथनिविष्ट करून आपण ते सर्वांपर्यंत सुलभतेने पोहोचवावेत अशी माझी विनंती आहे.' त्यांची ही विनंती मान्य करून स्वामीजींनी जो ग्रंथ लिहिला तो त्यांच्या ग्रंथसंपदेतील मुकुटमणी ठरला. त्यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाचा तो मार्गदर्शक ठरून साऱ्या जगभर जाऊन पोहोचला. त्या ग्रंथाचे नाव 'सत्यार्थ प्रकाश'. सुमारे ४०० पानांचा हा ग्रंथ आहे. याचे लेखन १२ जून १८७४ रोजी सुरू झाले. अडीच महिन्यांत तो लिहून पूर्ण झाला. याची पहिली आवृत्ती राजा जयकृष्णदास यांनी स्वखर्चाने १८७५ साली प्रकाशित करविली.

वेदांचे अपौरुषेयत्व; वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व; स्त्री, पुरुष व मुले यांची कर्तव्ये; अवैदिक साहित्य व धर्मपंथ यांचे दोष व उणीवा; समताधारीत समाजाच्या निर्मितीची आवश्यकता; बालविवाह, हुंडा, जादूटोणा, बुवाबाजी वगैरे अंधविश्वास, यावरील जोरदार हल्ले; स्त्री-शिक्षण, विधवा विवाह, ज्ञानविज्ञानाचा प्रसार, देशप्रेम, राष्ट्रभक्ती,

वगैरे पुरोगामी विचारांचे सयुक्तिक समर्थन; वगैरे गोष्टींचा समावेश या ग्रंथात करण्यात आलेला आहे. त्याच्या वाचनाने भारतीयांमध्ये स्वाभिमान व आत्मविश्वास जागृत व्हावा अशी दृष्टी स्वामीजींनी ठेवली आहे. त्यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाचा जगभर जो प्रसार झाला त्यावरून 'सत्यार्थ प्रकाशा'चे यश सहजच लक्षात येते.

स्वामीजींनी कोणतेही विधान आधाराशिवाय केलेले नाही. सत्यार्थ प्रकाशमधील विवेचनात त्यांनी शास्त्रशुद्ध व तर्कशुद्ध पद्धत वापरलेली आहे. आपल्या प्रत्येक विधानासाठी त्यांनी भरपूर व भक्कम आधार दिलेले आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे मान्य करणे भाग पडते. त्यांच्या टीकेतून स्वकीय व स्वधर्मीय लोकही सुटलेले नाहीत, यावरून त्यांनी किती तटस्थपणे व बुद्धी-प्रामाण्याच्या कसोटीवर घासून हे विवेचन केले आहे, याची कल्पना येते.

'सत्यार्थ-प्रकाश' या ग्रंथाची विभागणी १४ प्रकरणांत करण्यात आलेली आहे. प्रकरण या शब्दाऐवजी समुल्लास हा शब्द त्यांनी वापरलेला आहे. प्रथम 'समुल्लासात' परमेश्वराची नावे, ओम या शब्दाची व्याख्या, मंगलाचरण वगैरे गोष्टींचा समावेश आहे. दुसऱ्या समुल्लासात बालकांच्या शिक्षणासंबंधी आमूलाग्र विचार केलेला आहे. तिसऱ्या समुल्लासात अध्ययन व अध्यापन यांचा विस्तारपूर्वक विचार केलेला आहे. त्यामध्ये स्त्री-पुरुषांना विद्या का हवी, निघण्टू, निरुक्त, छंद, मनुस्मृती, रामायण, महाभारत, षटदर्शने, दशोपनिषद, चार वेद व चार ब्राह्मण ग्रंथ, ग्रंथप्रामाण्य, आदरणीय व त्याज्य ग्रंथ, इतिहास, पुराणे, सर्व वर्णांतील स्त्री-पुरुषांना वेदाध्ययनाचा अधिकार असणे, विद्याध्यनाचे महत्त्व वगैरे विषयांचा समावेश आहे.

चौथा समुल्लास, समावर्तन (अध्ययन पूर्ण झाल्यावर ब्रह्मचाऱ्याने घरी परत येणे व त्याप्रसंगी केला जाणारा संस्कार), विवाह व गृहस्थाश्रम यांच्या विवेचनासाठी समर्पित केलेला आहे. पाचव्या समुल्लासात वानप्रस्थविधी संन्यासविधी, धर्माची दहा लक्षणे, विद्वत्व व नृपत्व यांचा ऊहापोह आहे. सहाव्या समुल्लासात राजधर्माचे विवेचन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये अनियंत्रित राजा प्रजेला कसा घातक असतो, राष्ट्राची उन्नती व राजाचे कर्तव्य वगैरे विषयांचा समावेश आहे. सातव्या समुल्लासात वेद व ईश्वर यांची चर्चा असून, त्यामध्ये ईश्वराचे अस्तित्व, व्यापकत्व, स्तुती, सगुण व निर्गुण परमेश्वर, अवतार, जीवाची स्वतंत्रता, द्वैत-अद्वैतवाद, वेदांची उत्पत्ती व त्यांचे नित्यत्व इत्यादी विषयांचा समावेश आहे.

आठव्या समुल्लासात जगाची उत्पत्ती, स्थिती व लय यांची चर्चा आहे. नवव्या समुल्लासात विद्या-अविद्या, बंध-मोक्ष यांच्या व्याख्या चर्चिलेल्या आहेत. दहाव्या समुल्लासात आचार-अनाचार, भक्ष्य-अभक्ष्य यांची चर्चा आहे. अकराव्या समुल्लासात आर्यावर्तातील मतांचे खंडन-मंडन करण्यात आलेले आहे. बाराव्या समुल्लासात चार्वाक, बौद्ध व जैन मतांचे परीक्षण करण्यात आलेले आहे. तेराव्या समुल्लासात ख्रिस्ती पंथाचे विश्लेषण आहे. चौदाव्या समुल्लासात इस्लाम पंथाच्या गुण-दोषांची चर्चा करण्यात आलेली आहे.

महर्षी दयानंदांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाचे दहा सुवर्णसिद्धांत -

१. सर्व सत्यविद्या आणि जे पदार्थ विद्येने जाणले जातात त्या सर्वांचे आधी मूळ परमेश्वर आहे.

२. ईश्वर सच्चिदानंदस्वरूप, निराकार, सर्वशक्तिमान, न्यायकारी, दयाळू, अजन्मा, अनंत, निर्विकार, अनादी, अनुपम, सर्वाधार, सर्वेश्वर, सर्वव्यापक, सर्वांतरयामी, अजर, अमर, अभय, नित्य, पवित्र आणि सृष्टीकर्ता आहे. त्याचीच उपासना करणे योग्य आहे.

३. वेद सर्व सत्यविद्यांचे पुस्तक आहे. वेद शिकणे शिकवणे आणि ऐकणे ऐकवणे, हा सर्व आर्यांचा परमधर्म आहे.

४. सत्याचा स्वीकार करण्यास आणि असत्याचा त्याग करण्यास सदैव तयार असले पाहिजे.

५. सर्व कामे धर्मानुसार, अर्थात सत्य आणि असत्याचा विचार करून केली पाहिजेत.

६. सर्वांची शारीरिक आत्मिक आणि सामाजिक उन्नती करून, अखिल विश्वावर उपकार करणे हा या समाजाचा मुख्य उद्देश आहे.

७. सर्वांशी प्रेमपूर्वक धर्मानुसार यथायोग्य वर्तन केले पाहिजे.

८. अविद्येचा नाश आणि विद्येची वृद्धी केली पाहिजे.

९. प्रत्येकाने आपल्याच उन्नतीत संतुष्ट न राहता, सर्वांच्या उन्नती मध्ये आपली उन्नती समजली पाहिजे.

१०. सर्व मानवांनी, सामाजिक सर्वहितकारी नियम पाळण्यामध्ये परतंत्र असले पाहिजे व व्यक्तिगत हिताचे नियम पाळण्यात सर्वांनी स्वतंत्र असावे.

आर्यसमाजाचे हे सिद्धांत अकस्मात वा आयत्या वेळी तयार केलेले नव्हते. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या समितीने मुंबईत ते तयार केलेले होते. मुंबईतील आर्यसमाज स्थापनेच्या वेळी त्यांची संख्या २८ होती. मग लाहोर येथील आर्यसमाजाच्या स्थापनेप्रसंगी त्यांचे परिशीलन करून हे निवडक दहा सिद्धांत सुस्पष्टपणे लोकांसमोर मांडण्यात आले होते.

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर, पदोपदी आपल्या संस्कृतीस हीन लेखणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना 'वैदिक धर्मा'चे श्रेष्ठत्व पटवून देणाऱ्या महान नेत्यांत स्वामी दयानंदांचे नाव अग्रभागी आहे. परवशतेने त्रस्त झालेल्या आर्यावर्तात 'वैदिक धर्मा'चे श्रेष्ठत्व त्यांनी पुनर्प्रस्थापित केले. 'आर्य समाजा'ची स्थापना केली. जनसामान्यांचा आत्मविश्वास वाढवला. भारताचे स्वातंत्र्ययुद्ध, गोवा आणि हैदराबाद मुक्तीसंग्राम यांतील आर्यसमाजाचा सहभाग हा तर एक दैदिप्यमान अध्यायच आहे. पंडित गुरुदत्त विद्यार्थी, लाला लाजपत राय, स्वामी श्रद्धानंद अशा महर्षी दयानंदांच्या उत्तमोत्तम शिष्यांनी भारतीय जनजीवनास समृद्ध केलेले आहे. अशा समग्र क्रांतीचे अग्रदूत ठरलेल्या महर्षी दयानंद यांना, त्यांच्या जन्माच्या द्विशताब्दीनिमित्त सादर प्रणाम. त्यांच्या जीवित आणि कार्यांतून प्रेरणा घेऊन, नवयुवकांनी आर्यावर्तास पुन्हा पूर्ववैभव प्राप्त करवून द्यावे हीच सदिच्छा!

**संदर्भः**

१. समग्र क्रांतीचे अग्रदूत- महर्षी दयानंद सरस्वती, लेखक श्रीपाद जोशी, प्रकाशक हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठान, पिंपरी, मार्च २०२१, मूल्य रु.१२०/-

२. स्वामी दयानंद सरस्वती https://inmarathi. net/swami-dayanand-saraswati-information-in-marathi/

३. सत्यार्थ प्रकाश, स्वामी दयानंद सरस्वती, मराठी अनुवाद- श्री. पं. दास विद्यार्थी, प्रकाशक दिव्ययोग मंदिर ट्रस्ट, १३ एप्रिल २०१६, मूल्य रु.१५०/-

**- नरेंद्र गोळे**
ज्येष्ठ संशोधक व वैज्ञानिक
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com


•••

कुरूप 'मना'पेक्षा कुरूप चेहरा चांगला !

# भारतीय इतिहास लेखनाची अनोखी पद्धत

*भारतीय परंपरेने इतिहास लेखनाची एक अनोखी पद्धत कालांतराने विकसित केली आहे. पाश्चात्त्यांना जसा साचेबंद इतिहास मान्य आहे तसा न लिहिता कथांच्या माध्यमातून तो इतिहास लिहिला गेला. यावर प्रकाश टाकणारा श्री शैलेंद्र कवाडे यांचा लेख - संपादक*

गेम ऑफ थ्रोन ह्या सिरीजमध्ये Three Eyed Raven ही एक कल्पना आहे. आपल्या हजारो डोळ्यांनी ही व्यक्ती जगात घडत असलेल्या सगळ्या घटना बघत असते, ती त्यांचा भाग नसते, पण ती एक निरीक्षक असते. जेव्हा आर्मी ऑफ डेड्स मानवाला संपवण्याचा प्रयत्न करत असते, तेव्हा ती खासकरून ह्या Three Eyed Raven ला संपवण्याचा प्रयत्न करते, कारण ती व्यक्ती म्हणजे मानवी वंशाचा जिवंत इतिहास असते, स्मृती असते. ती स्मृती संपली की जिवंत व मृत मानवात फरक राहणार नसतो.




चौदाशे वर्षांपूर्वी अरबस्थानातील एका कोपऱ्यात इस्लाम नावाच्या धर्माची स्थापना झाली. विरळ लोकवस्तीच्या वाळवंटात इस्लाम वेगाने पसरला. तिथल्या देवतांची, धर्माची आणि त्या धर्माच्या गोष्टींचीही स्मृती त्याने पुसून टाकली. नंतर इस्लाम इराणमध्ये आला. खरंतर इराणी संस्कृती भारतीय संस्कृतीसारखीच जुनी. भारतीय आणि इराणी सांस्कृतिक विश्वात अगदी एकमेकांच्या बहिणी शोभाव्यात इतकी समानता. मात्र इस्लामच्या झपाट्यापुढे इराणच नव्हे, तर इराणी संस्कृतीही पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली. एकेकाळी जगाच्या मोठ्या भागावर राज्य केलेली पर्शियन संस्कृती संपली.

मग इस्लाम भारतात आला. एका हातात पुस्तक आणि दुसऱ्या हातात तलवार घेऊन आला. भारतावर अरबी वंशाचे आणि इस्लामी धर्माचे आक्रमण सुरू झाले. भारताच्या सीमेवर असलेला, इराणचा शेजारी असलेला अफगाणिस्तान आणि त्याच्या वरचा मध्य आशिया हळूहळू पूर्णपणे इस्लामी झाला, मात्र ह्यालाही शे-दोनशे वर्षं लागली. अफगाणिस्तान अंकित झाल्यावर हळूहळू इस्लाम भारताच्या मुख्य भूमीवर पसरू लागला. तीन-चारशे वर्षं लढून पंजाब आणि उत्तर भारत इस्लामी झेंड्याखाली आला. तेराव्या शतकानंतर तर इस्लाम पूर्ण भारतभर पसरला. उणीपुरी पाचेकशे वर्षं सगळा भारत इस्लामी सत्तेखाली आणि दट्ट्याखाली होता.

पण तरीही भारतीय धर्म आणि भारतीय संस्कृती नष्ट झाली नाही. जे इस्लामला अरबस्थानात, पर्शियात जमले ते भारतात जमले नाही. भारत आणि भारतीय संस्कृती टिकून राहिली. इस्लामने लढाया जिंकल्या पण युद्ध अजूनही सुरू आहे. भारतीय धर्म आणि संस्कृती परत परत पुनरुज्जीवित होत राहिली, राखेतून पुन्हा फुलत राहिली. का?

संस्कृती आणि राजकारणाच्या कोणत्याही

अभ्यासकापुढे हा मोठा प्रश्न आहे. इस्लाम भारतात का थबकला? हिंदू संस्कृती आणि धर्म का टिकला?

भारतीय समाजाची रचना, ग्रामाधारीत अर्थव्यवस्था, बहुदैवीक व बहुपंथी समाज अशी अनेक कारणं ह्या बाबतीत दिली जातात. माझ्या मते अजून दोन महत्त्वाची कारणं आहेत ज्यांची चर्चा शक्यतो होत नाही.

पहिले कारण म्हणजे, भारतीय समाजाची आणि संस्कृतीची स्मृती आणि ती स्मृती जतन करण्याची एक विशिष्ट पद्धत. भारतीय समाज स्वतःच्या इतिहास लेखनाबद्दल आळशी आहे असे आपण बऱ्याचदा म्हणतो. माझ्या मते हे अर्धसत्य आहे. भारतीय समाज आपला इतिहास एका विशिष्ट पद्धतीने लिहायचा. ह्या इतिहासाला अनेकदा काव्याचे रूप दिले जायचे, अनेकदा त्यात कल्पनाविलास मिसळला जायचा. त्या इतिहासातील व्यक्तींचे दैवतीकरण केले जायचे. त्यांच्या गोष्टी लिहिल्या आणि सांगितल्या जायच्या. त्यातच तत्त्वज्ञान व धर्म विणून घेतला जायचा, रूढी निर्माण केल्या जायच्या, एका पिढीतून दुसऱ्या पिढीत पसरवल्या जायच्या. त्यात नीतीतत्त्वांची, कर्तव्यांची, आदर्शांची पेरणी केली जायची. काळानुसार त्या कथेत नवीन उपकथानक यायचे. नवीन नायक आणि नायिका यायच्या, प्रसंग यायचे. आज आपण ज्याला महाकाव्यातील, धार्मिक ग्रंथातील प्रक्षिप्त भाग म्हणतो तो खरेतर त्या साहित्यावर पडलेली काळाची सावली आहे. प्रक्षिप्त भाग आपल्याला त्या काळात काय घडत असेल ह्याची कल्पना देतो.

दुसरे कारण म्हणजे, आपल्या धर्माची आणि संस्कृतीची स्मृती जपण्याची भारतीयांची अजून एक पद्धत, मंदिरं आणि शिल्पकला. भारतीय मंदिरं ही निव्वळ प्रार्थनास्थळ नाहीत. तो संस्कृतीचा कोरीव आरसा असतो. समाजाच्या त्या काळातील समजुती, नजीकच्या इतिहासातील प्रतिकात्मक गोष्टी, बदलत गेलेली आराध्य दैवतं आणि आदर्श पुरुष, उपासनेच्या बदललेल्या पद्धती, उन्नत आणि अवनत होत गेलेले सांस्कृतिक प्रवाह.. हे सगळं आपल्याला मंदिरांतून कळू शकतं. प्रत्येक मंदिर हे एक काव्य आहे, एक गोष्ट आहे, एक इतिहास आहे.

म्हणूनच भारतीयांनी मंदिरं बांधणे थांबवले नाही, ग्रंथ लिहिणे, काव्य शिकवणे, पुराण सांगणे थांबवले नाही. इतिहास अलंकृत करून सांगणे थांबवले नाही. इतिहासातून चमत्काराची आणि चमत्कारातून नीतीतत्त्वांची फारकत केली नाही. संपूर्ण खऱ्या पण निरस इतिहासाची जपणूक केली नाही.

भारतीयांनी इतिहास 'गोष्ट' म्हणून सांगितला.

आणि 'गोष्ट' हे मानवी समाजातील सगळ्यांत शक्तिशाली हत्यार आहे. प्रत्येक धर्म ही एक गोष्ट आहे, नीती-अनीती, आदर्शवाद, राज्य व्यवस्था ह्या आपण एकमेकांना 'फुलवून सांगितलेल्या गोष्टी' आहेत. गोष्टी आपल्या लक्षात राहतात, आपल्याला गोष्टी आवडतात. हळूहळू आपण गोष्टी जगतो! ज्याची गोष्ट जास्त इंटरेस्टिंग, जास्त कन्व्हिन्सिंग ती जास्त ऐकली जाते, जास्त सांगितली जाते, जास्त टिकते!

भारतीय संस्कृती ही अशीच एक 'गोष्ट' आहे.

दर पिढीत परत परत सांगितली गेलेली, अश्वत्थ वृक्षासारखी पारंब्यातून फुलणारी, जिवंत आणि रसरशीत..

आपणही आपल्या पिढीचे कर्तव्य केले पाहिजे, ती गोष्ट परत एकदा सांगितली पाहिजे.

**– शैलेंद्र कवाडे**
संस्कृती विश्लेषक
डोंबिवली

●●●

# नारी शक्ती ते राष्ट्र शक्ती...

*एक फेब्रुवारी रोजी संसदेमध्ये सादर झालेल्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करणारा डॉ. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी यांचा लेख - संपादक*

२०२४ सालचा अंतरिम अर्थसंकल्प हा एका अर्थाने विद्यमान मोदी सरकारच्या 'भविष्यातील अपेक्षा, नियोजनातील सातत्य आणि प्रचंड आत्मविश्वास' यांचा अत्यंत सुसंगत गोषवारा होता असे म्हणावे लागेल. या वर्षी एप्रिल ते मे महिन्यात देशात लोकसभेची निवडणूक अपेक्षित असल्याने संपूर्ण अर्थसंकल्प न मांडता केवळ पुढील ३ महिन्यांसाठी होणारा महसुली खर्च करता यावा यासाठी लेखानुदान (vote of account) संसदेत सादर करणे एवढेच या अर्थसंकल्पीय सत्रात अपेक्षित होते. परंतु, लोकानुनयी योजनांच्या घोषणा करून अर्थसंकल्पीय अधिवेशनाकडे सरकार 'निवडणूक प्रचार करण्याची संधी' म्हणून बघत आहे आणि म्हणून हे खऱ्या अर्थाने 'इलेक्शन बजेट' असणार असा माध्यमांचा अंदाज हाणून पाडत कुठल्याही नव्या योजनांची जंत्री न मांडता; अत्यंत साध्या परंतु आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने त्यांनी लेखानुदान मांडले.

मागच्या ८ वर्षांत देशातील गरीब - वंचित घटक, महिला व बाल कल्याण, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी सरकारी पातळीवर केलेल्या प्रयत्नाचा आढावा घेत निवडणुकीच्या नंतर पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात नवीन, पूर्णरूपी अर्थसंकल्प मांडला जाईल आणि २०४७ सालापर्यंत 'विकसित भारत' होण्याच्या दृष्टीने सातत्यपूर्ण आणि दमदार कामगिरी केली जाईल असा विश्वास अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केला. या निर्धारातूनच 'सबका साथ, सबका विकास' करण्यासाठीची सरकारची बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते.

खरं तर मागच्या सहा वर्षांत ज्या पद्धतीने अर्थमंत्री निर्मला सीतारामन त्यांची जबाबदारी पार पाडत आहेत तेच मुळी महिला सबलीकरणाचे आपल्या देशातील उत्कृष्ट उदाहरण आहे. कोविड आणि कोविडोत्तर काळात अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट आणि प्रामाणिक काम यामुळेच भारत आज जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनू शकला आहे. राजकीय साठमारीत आणि विरोधकांच्या मतलबी बजबजपुरीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे सोज्ज्वळ व्यक्तिमत्त्व आणि अर्थशास्त्रीय कौशल्य उजळून निघाले हे निश्चित. त्यांना त्यांच्या कार्याचे योग्य असे श्रेय द्यायलाच हवे. अत्यंत कठीण परिस्थितीतून अर्थव्यवस्थेला गर्तेतून बाहेर काढत रुळावर आणण्याचे त्यांचे कार्य भारतीय समाज आणि आपली पिढी कायम लक्षात ठेवील.

समाजातील गरीब घटक, महिला, युवापिढी आणि अन्नदाता शेतकरी याच खरे तर सामाजिक उतरंडीच्या जाती असून; हा आर्थिक भेदाभेद नष्ट करण्यासाठी सर्वसमावेशक आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे यापूर्वीदेखील अनेकदा दिसून आले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात या चार वर्गांतील आर्थिक विकासाचा अनुशेष भरून निघावा यासाठी भरीव प्रयत्न करण्याची गरज सरकारने अधोरेखित केली आणि त्या अनुषंगाने योजनांचे सूतोवाच केले गेले. विशेषतः गेल्या काही वर्षांतील 'महिला केंद्रित योजनांचे' यश पाहता पुढील सांख्यिकीतून काही बदल प्रकर्षाने जाणवतात:

सगळेच निर्णय मनाने घेऊ नका; काही निर्णय 'बुद्धीला'ही घेऊ द्या.

१. आजवर 'मुद्रा कर्ज योजने'च्या अंतर्गत ३० कोटी मुद्रा कर्जे महिला उद्योजिकांना देण्यात आलेली आहेत. या कर्जाची रक्कम ही साधारण २२.५ लाख कोटी रुपये एवढी आहे.

२. मागच्या १० वर्षांत उच्च शिक्षण संस्थांमध्ये मुलींच्या प्रवेशाचे प्रमाण २८ टक्क्यांनी वाढले आहे.

३. STEM[2] म्हणजे शास्त्र, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या शाखांमध्ये मुलींच्या प्रवेशाचे प्रमाण सर्वांत जास्त भारतात आहे. हे प्रमाण एकूण प्रवेशाच्या ४३ टक्के एवढे आहे.

४. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ग्रामीण भागांत देण्यात आलेल्या एकूण घरांपैकी ७० टक्के घरांची पूर्ण अथवा अंशतः मालकी ही स्त्रियांची आहे. यातून स्त्रियांना संपत्तीचा मालकी हक्क मिळाला असून, 'स्त्री सन्मान' प्राप्त झाला आहे.

५. मागच्या ५ वर्षांत महिलांकडून चालवण्यात येणाऱ्या उद्योगांच्या संख्येत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे व येणाऱ्या ५ वर्षांत ९० टक्क्यांनी अशी वाढ होणे अपेक्षित आहे.

६. मागच्या दहा वर्षांत स्त्रियांना संधींची समानता, उद्योजकतेस उत्तेजन आणि सन्मानपूर्वक वागणूक मिळण्यात वाढ झाली आहे आणि त्यातून महिला सक्षमीकरणास व आर्थिक स्वावलंबन प्राप्त होण्यास हातभार लागतो आहे.

२०२४ -२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पात / लेखानुदानात महिला व बाल विकास मंत्रालयास २६ हजार कोटी रुपयाचे अनुदान मिळाले असून, महिला केंद्रित विकासासाठी मागच्या वर्षीच्या खर्चाच्या तुलनेत या वर्षी २.५२ टक्क्यांची वाढ झालेली आहे. यापैकी २१ हजार कोटी रुपये हे 'सक्षम अंगणवाडी आणि पोषण अभियान' २.० या योजनांवर खर्च होणार असून, लहान वयातील मुलींच्या पोषण आहारावर भर देण्यात आलेला आहे. मिशन 'शक्ती' या अभियानांतर्गत महिला सुरक्षा आणि सबलीकरणांसाठी ३,१४५.९७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. स्टॅन्ड अप इंडियाच्या माध्यमातून वितरित झालेल्या ३ लाख कर्जापैकी ८४ टक्के कर्जे महिलांना, -उद्योजिकांना देण्यात आलेली आहेत. ग्रामीण भागांत कार्यरत असणाऱ्या व ९ कोटी महिलांना सामावून घेणाऱ्या ८३ लाख 'महिला बचत गटांना' शासकीय योजनांचे व स्वस्त कर्ज योजनांचे लाभ मिळत आहेत. शाश्वत अशा स्वरूपाचे १ लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या 'लखपती दीदी' या योजनेचे यश लक्षात घेता, बचत गटासाठी काम करणाऱ्या ३ कोटी महिलांपर्यंत ही योजना पोचवण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. हे लक्ष्य २ कोटींवरून ३ कोटी महिलांपर्यंत वाढवण्यात आले आहे. म्हणजेच 'लिंगाधारित अंदाजपत्रक' (gender budget) या परिभाषेनुसार या वर्षीच्या अर्थसंकल्पात मागच्या वर्षीच्या तुलनेत लिंगाधारित अंदाजपत्रकात ३८.६ टक्क्यांची वाढ झाली आहे. या तरतुदीत २०२४ सालातील निव्वळ वाढ ही ६.५ टक्के एवढी आहे. तर मागच्या वित्तीय वर्षात हे प्रमाण अर्थसंकल्पाच्या एकूण खर्चाच्या ५ टक्के एवढेच होते. स्वच्छ पाण्याची उपलब्धता, आरोग्याच्या सोयी, माता व बालक आहार आणि पोषण, नवीकरणक्षम ऊर्जा साधनांची उपलब्धता, उज्ज्वला गॅस योजना या योजनांच्या माध्यमातून महिला विकासासाठी सातत्याने प्रयत्न होताना दिसत आहेत.

अर्थात, स्त्रियांच्या दृष्टिकोनातून संशोधन व विकास (RD), श्रमबाजारातील सहभाग (Labour force participation), उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या संधी

(पृष्ठ क्र.१४ वर)

---

औदार्य म्हणजे तुमच्या क्षमतेपेक्षा अधिक देणं आणि आत्मसन्मान म्हणजे तुमच्या गरजेपेक्षा कमी घेणं.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्य की स्वैराचार?

*डॉ. अपर्णा लळिंगकर या पुणे विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य आहेत. २ फेब्रुवारी रोजी ललित कला केंद्रात सादर झालेल्या एका नाटकात रामायणातील पात्रांचे प्रदर्शन विकृतपणे दाखवण्यात आले होते. या संदर्भात त्यांनी लिहिलेला लेख – संपादक*

शुक्रवार २ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्री सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'ललित कला केंद्रा'तर्फे तीन नाटके/प्रहसने सादर केली गेली. त्यात 'जब वुई मेट' या नाटकाच्या सादरीकरणात रामलीला, रामायण यातील काही संदर्भ, रामायणातील पात्रे, त्यांची नावे आणि वेषभूषा हे वापरून रामलीलेच्या बॅक स्टेजवर ते आर्टीस्ट कसे वागतात याचे नाट्यीकरण दाखवले गेले ! त्यात आक्षेपार्ह वर्तन आणि अश्लील भाषा वापरली गेली. त्यामुळे अभाविपच्या तिथे उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यावर आक्षेप घेतला; तर तिथे हाणामारी झाली. विद्यापीठातून असे समजले की, ही तीन नाटके कुठल्यातरी प्रॅक्टिकलचा भाग होती ! त्यामुळे तिथे विभाग प्रमुखही उपस्थित होते. 'असा आक्षेप घेणे हा आमच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला आहे' अशा प्रकारचा कांगावा ज्यांनी हे सादरीकरण केले त्यांच्याकडून करण्यात आला. एक सुजाण भारतीय नागरिक, भारतीय संस्कृतीची चाहती, अभ्यासक आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा सदस्य या नात्याने माझ्या मनात काही प्रश्न उपस्थित होत आहेत ते मी जाहीरपणे लिहिते आहे. अपेक्षा अशी आहे की, आपण आपल्या पुढच्या पिढ्यांना कोणती आणि काय दिशा द्यायची? आणि कशाचे समर्थन करावयाचे याचा समाजात नीट विचार व्हावा.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या व्याख्येत जसा व्यक्तीला स्वत:चे मत कोणतीही भीती न बाळगता मुक्तपणे मांडण्याचा अधिकार दिला आहे; त्याचबरोबर या मुक्तपणाला काही बंधनंही एक समाजव्यवस्था म्हणून घातलेली आहेत. या बंधनांमध्ये प्रामुख्याने कुणाची जाहीर निंदा, मानहानी, अश्लीलता, पोर्नोग्राफी, राजद्रोह, भडकावणे, द्वेषयुक्त भाषण, गोपनीय मजकूर, प्रतिष्ठेस धक्का इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यात स्वैराचार अपेक्षित नाही हे उघड आहे. शुक्रवारी 'ललितकला केंद्रा'तर्फे जी नाटके सादर केली गेली त्यात स्वैराचार दिसतो आहे ना की स्वातंत्र्य?

'जब वुई मेट' या नाटकाच्या काही भागांचे व्हिडिओ मी पाहिले. त्यात सीतामातेचा वेष परिधान केलेल्या मुलीच्या तोंडी अश्लील भाषा (तिच्या तोंडी म पासून चालू होणाऱ्या शिव्या होत्या), असभ्य वर्तन (ती कोणाचीतरी गचांडी पकडते आहे), ती सिगरेट ओढत असताना दाखवलेली आहे. राम, सीता, हनुमान, रावण आणि इतर पात्रे यांच्या तोंडी असलेले संवादही उपहास आणि विनोद दर्शविणारे होते. त्यात राम, 'भागा राम भागा अशा आशयाचे गीतही होते. आता प्रत्यक्षा नाटकात राम पळून जात नसून रामलीलेत रामाची भूमिका करणारा मुलगा वैतागून पळून जातो असा प्रसंग आहे. पण एकूण सगळ्यावर आक्षेप घेण्यामागे काही मुद्दे आहेत.

१) ललितकला केंद्राच्या प्रॅक्टीकल परीक्षा किंवा इंटरनल सरावाला विद्यापीठ आवारातील वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निमंत्रण का पाठविले?

२) अशा प्रकारच्या प्रॅक्टीकल परीक्षेला किंवा सरावाला

येताना विद्यार्थी क्रिकेट बॅट्स, हॉकी स्टीक्स, लाठ्या, काठ्या यांच्या साठ्यासह कसे काय येतात?

३) विद्यापीठासारख्या उच्च शिक्षण संस्थेच्या गरिमेचा विचार करता अश्लिल भाषा, असभ्य वर्तन आणि हिंदू धर्मियांच्या देव-देवतांच्या वेषभूषेत चुकीचे वर्तन दाखवणे हे कोणत्या 'एकॅडमिक्स' मध्ये बसते?

४) रिॲलिटीच्या नावाखाली आपण बॅक स्टेज आर्टीस्ट काय करतेय/करतोय हे दाखवताना मर्यादा पाळणार, की कुणी ड्रग्ज ओढत असतील, सेक्स करत असतील तर ते पण दाखवणार का?

यात मुद्दे असे आहेत की, आपण सादर करत असलेली संहिता ही प्रश्न उपस्थित करणारी आणि आक्षेपार्ह आहे याची कल्पना संबंधितांना होती. म्हणूनच ते लाठ्या, काठ्या, क्रिकेट बॅट्स इ. च्या तयारीने आले होते! विद्यापीठातील वसतीगृहातील विद्यार्थ्यांना खिल्ली उडविण्याच्या दृष्टीने गोळा करण्यात आले होते. व्हिडिओ मध्ये त्यांचा हशा आणि हुल्लडबाजी ऐकावयास येते आहे. हिंदू धर्मियांत प्रभू राम, सीतामाई, लक्ष्मण, हनुमान या व्यक्तीरेखा आदर्श म्हणून डोळ्यांसमोर ठेवलेल्या असतात. मुद्दाम त्यांच्या वेषभूषेत आक्षेपार्ह गोष्टी दाखवून त्यांचा अपमान करणे हे शिक्षण विद्यापीठात मिळत नसते. तर बाहेरच्या समाज विघातक शक्ती आपल्या प्रभावाखाली हे घडवून आणत असतात. अगदी कोणताही चित्रपट प्रदर्शित होण्याआधी सेन्सॉर बोर्डाच्या निकषांतून त्याला पार व्हावं लागतं. मग 'सावित्रीबाई फुले' यांच्या नावाने जे विद्यापीठ आहे त्यातील ललित कला केंद्राने सीतामातेची व्यक्तीरेखा साकारणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तोंडी अश्लील शिव्या, असभ्य वर्तन, सिगरेट स्मोकींग दाखवून इतकी सुद्धा आचार संहिता पाळू नये म्हणजे कमाल आहे? विभाग प्रमुखांच्या संमतीनेच हे सर्व झालेले आहे हे उघड आहे. त्यामुळे मा. कुलगुरू त्यांच्यावर नियमाप्रमाणे जी कारवाई करायची ती करतीलच; पण एक समाज म्हणून आपण खालील गोष्टींचा विचार करू शकतो का?

आपण आपल्या मुलांसमोर-तरुणांसमोर चांगले आदर्श ठेवतो. का? तर त्यांनी त्यातून प्रेरणा घेऊन आपलं भविष्य घडवावं. मग आपण एका दारुड्या, गांजा ओढणाऱ्या व्यक्तीचं ग्लोरिफिकेशन करू, की एका सज्जन व्यक्तीरेखेचं? मुळात सीतामाता ही भारतीय स्त्रीजीवनाचा आदर्श आहे. सीतामातेचा संयम, सहनशीलता, तिची मर्यादा हे आदर्श आहेत. भारतीय संस्कृतीत द्रौपदी, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांसारख्या स्त्रिया या आधुनिकता, स्त्री स्वातंत्र्य यांच्या आयकॉन्स आहेत. एखादी मुलगी अश्लील भाषा वापरताना, असभ्य वर्तन करताना, घाणेरड्या शिव्या देताना, सिगरेट फुंकताना दाखविणे म्हणजे ती मुलगी आधुनिक, मुक्त आहे अशी संकल्पनाच चुकीची आहे.

आधुनिक काळात बी आर चोप्रा यांनी काढलेल्या महाभारत या मालिकेच्या बॅकस्टेज आर्टीस्टवरील हा किस्सा अत्यंत प्रेरणादायी आहे. महाभारत या सिरीयल मध्ये अर्जुनाची भूमिका करणारा कलाकार हा फिरोज खान नावाचा मुसलमान अभिनेता होता. त्यानेच स्वत:च्या तोंडून सांगितलेले मी ऐकले आहे की, 'महाभारत सिरीज मध्ये काम करायला सुरुवात केल्यावर अर्जुन या व्यक्तीरेखे भोवतीचे वलय, त्याची पवित्रता लक्षात आली. नंतर आपणहून त्याने सिगरेट ओढणे, दारू पिणे बंद केले, मांसाहार देखील सोडून दिला आणि तो शाकाहारी बनला!' रामानंद सागर यांनी काढलेल्या रामायण सिरीयलला इतकी वर्षे झाली तरी अजूनही रामाची व्यक्तीरेखा साकारणाऱ्या अरुण गोविल

दिसल्यावर लोक त्यांच्या पाया पडतात. यातून त्या कलाकारांना रामायण, महाभारत यांतील व्यक्तीरेखा आणि त्यात दिलेल्या शिकवणुकीचे महत्त्व अनुभवास येते आणि पटते देखील. मग 'ललितकला केंद्रा'च्या लोकांना अशा बॅक्स्टेजच्या गोष्टी का नाही दाखवाव्याशा वाटल्या? ज्या आक्षेपार्ह आहेत अशाच का दाखवाव्याशा वाटल्या?

या ठिकाणी त्यामुळे ललित कला केंद्राचे विभाग प्रमुख आणि संबंधित विद्यार्थी यांच्या हेतूंवर शंका उपस्थित होते. आपल्याच युवकांना भविष्यात चांगली दिशा देणारे, त्यांना चांगले मार्गदर्शन करणारे प्राध्यापक आपल्याला विद्यापीठात अपेक्षित आहेत ना; की समाजात दुही पसरविण्यास प्रोत्साहन देणारे, समाजाच्या आदर्शांची खिल्ली उडविणारे? त्यामुळे सगळ्यांनीच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली अशा प्रकारे विद्यार्थ्यांना चुकीची दिशा दाखविणाऱ्यांचा निषेधच केला पाहिजे. एक समाज म्हणून आपण जेव्हा समग्रपणे विचार करतो तेव्हा काही नियम, मर्यादा अपेक्षित असतात. त्या नियमांचे उल्लंघन हे समाजाच्या मर्यादेचे उल्लंघन असते हे लक्षात ठेवावे. शुक्रवारी ललितकला केंद्रात जे नाटक दाखवले यातून अश्लीलता, मर्यादा, हिंदूंच्या भावनांना धक्का पोहोचवणे, विद्यापीठाच्या प्रतिष्ठेस धक्का पोहोचवणे अशा प्रकारच्या गोष्टी जाणीवपूर्वक घडवलेल्या आहेत. याचाच अर्थ हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसून, अभिव्यक्तीचा स्वैराचार आहे हे लक्षात घ्यावे. अशा मानसिकतांचा एकमुखाने निषेध करावा.

**– डॉ. अपर्णा ललिंगकर**
पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य
पुणे

•••

(पृष्ठ क्र.११ वरून – **नारी शक्ती ते राष्ट्र शक्ती** )

आणि पतपुरवठा याकडे अजून लक्ष देण्याची गरज असून, श्रमात स्त्रियांचा टक्का वाढणे ही विकसित भारताच्या यशस्वी वाटचालीसाठी पूर्वअट ठरणार आहे. 'नारी तू नारायणी' या संबोधनाने सुरुवात करून, निर्मला सीतारामन यांनी ६ वर्षांपूर्वी या देशातील स्त्री शक्तीला विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन केले होते. मागच्या काही वर्षांतील प्रगती पाहता 'नारी शक्ती ते राष्ट्र शक्ती' हा संकल्प नक्कीच पूर्णत्वाला जाईल असा विश्वास वाटतो. 'सामाजिक न्याय साध्य करणे हे आमच्यासाठी केवळ घोषणेचे आणि टाळ्या घेण्याचे विधान नव्हे, तर ती आमची जबाबदारी आहे' असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत अधोरेखित करतात तेव्हाच 'समन्यायी विकासाची सुस्पष्ट वाटचाल' निश्चित होताना दिसते. सुसंस्कृत आणि संतुलित समाजाच्या निर्मितीसाठी देशाचा 'अमृत काल ते कर्तव्य काल' या दरम्यान स्त्री सबलीकरणाचा हा प्रवास निश्चितच यशस्वी होईल यात शंका नाही.

**– डॉ. अपर्णा कुलकर्णी–धर्माधिकारी**

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

आयुष्यात प्रेम करा; पण प्रेमाचं प्रदर्शन करू नका.

# ऋतू कवितेचे - भाग १

*मुंबई विद्यापीठाच्या कम्युनिटी रेडिओ केंद्रावर प्रसारित झालेला ज्येष्ठ गझलकार श्री. सुरेश भट यांचा गजलेवर प्रकाश टाकणारा गीतकार श्रीपाद जोशी यांचा लेख - संपादक*

रसिक श्रोतेहो, नमस्कार. विद्यापीठाच्या 'मस्ट' या रेडिओ चॅनेलवर तुमचं खूप खूप स्वागत. आपल्या चॅनेलवर आजपासून एक नवा कार्यक्रम सुरू करणार आहोत. आणि या कार्यक्रमाचं नाव आहे : ऋतू कवितेचे. कविता म्हटलं की अनेकांच्या मनात संमिश्र भावना उमटत असतात. कविता कधी आपल्याला हळवी करून सोडते, ती आपल्याला एकाकीपणात आधार देते. एखाद्या नुकत्याच प्रेमात पडलेल्या प्रियकर-प्रेयसीला गालात हसवते. कुणाला एखादी कविता वाचून मनसोक्त रडावं वाटतं. कुणी आपल्या आतली सल, कुठला दाह कवितेच्या कुठल्यातरी ओळींशी कनेक्ट करून आपल्या भावनांना वाट मोकळी करून देतो. काही कविता मनात चैतन्य पसरवतात. काही कवितांमुळे अंगात वीरश्री संचारते. आणि कधी कधी तर कविता टिंगलटवाळीचा देखील विषय बनते ! तुम्ही-आम्ही शालेय जीवनापासून कविता वाचत आलो आहोत. कधी काही कविता मनाला भिडल्या तर कधी काही कविता आपण ऑप्शनला टाकल्या. मात्र एक खरं की, कविता आपल्या आयुष्यात आली होती. काहींनी तिला आपलंसं केलं, तर काहींना कालौघात नाही जमलं. ऋतू कवितेचे हा कार्यक्रम अशाच नॉस्टॅल्जिया घेऊन आला आहे. आपल्या मनाचे पदर हळुवारपणे उलगडवून दाखवायला. काय मग, तुम्ही आहात ना सज्ज?

आजच्या एपिसोडमध्ये आपण प्रख्यात कवी, गझलकार सुरेश भट यांची एक गझल वाचणार आहोत, आणि सोबतच, मी श्रीपाद जोशी, त्या कवितेच्या अनुषंगाने आपल्या भावभावनांचे काही धागे गुंफत आपल्याशी संवाद साधणार आहे आणि सुरेश भट यांची गझल वाचायला एक निमित्तदेखील आहे. सुरेश भट यांचा जन्म एप्रिल महिन्यातला. १५ एप्रिल १९३२ ही त्यांची जन्मतारीख. तर त्यांच्या जयंतीचा हा महिना. 'रूपगंधा' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. त्यानंतर १९८३ साली 'रंग माझा वेगळा' हा प्रकाशित झालेला त्यांचा दुसरा संग्रह. 'एल्गार, झंझावात, सप्तरंग' हे त्यांचे आणखी महत्त्वाचे प्रकशित झालेले संग्रह. आणि हो; ४५० कलाकारांनी एकत्र येऊन सादर झालेलं 'मराठी अभिमानगीत':

लाभले अम्हास भाग्य, बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी
धर्म-पंथ-जात एक, जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

हे गीत देखील सुरेश भटानीच लिहिलेलं आहे बरं का! म्हणूनच पहिले चार एपिसोड आपण अर्पण करणार आहोत सुरेश भट यांना. तर वाचू या त्यांची आजची एक नितांत सुंदर गझल.

इतकेच मला जातांना सरणावर कळले होते
मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते

ही दुनिया पाषाणांची बोलून बदलली नाही
मी बहर इथे शब्दांचे नुसतेच उधळले होते

गेलेल्या आयुष्याचा मधुमास गडे विसरू या
(पाऊल कधी वाऱ्याचे माघारी वळले होते?)

---

आयुष्यात कुठलीच नाती ठरवून जोडता येत नाहीत.

मी ऐकवली तेव्हाही तुज माझी हीच कहाणी
मी नाव तुझे तेव्हाही चुपचाप वगळले होते

याचेच रडू आले की, जमले न मला रडणेही
मी रंग तुझ्या स्वप्नांचे अश्रूंत मिसळले होते

नुसतीच तुझ्या स्मरणांची एकांती रिमझिम झाली
नुसतेच तुझे हृदयाशी मी भास कवळले होते

घर माझे शोधाया मी वाऱ्यावर वणवण केली
जे दार खुले दिसले ते आधीच निखळले होते

मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत होतो
मी विझलो तेव्हा सारे आकाश उजळले होते

गझल हा काव्यप्रकार तसा प्रसिद्ध प्रकार आहे. दोन ओळींचा एक शेर असे अनेक शेर गझलेत असतात. प्रत्येक शेर एक स्वतंत्र कविताच असते. आणि म्हणूनच दोन ओळींत विषय सुरू करून तो विषय प्रभावीपणे संपवायचा याला प्रतिभेबरोबर कौशल्यदेखील लागतं. सुरेश भटांनी मराठीत गझल रुजवली. आज अनेक गझलकार भटांनी आखून दिलेल्या रस्त्यावर स्वतःच्या शैलीतली गझला लिहीत मार्गक्रमण करत आहेत.

मित्रहो, गझलेच्या पहिल्या शेराला 'मतला' असं म्हणतात. तर या गझलेचा मतला आहे :

इतकेच मला जातांना सरणावर कळले होते
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते....

जगणं अनेकांना अनेक अर्थी छळत असतं. जीवन सुखदुःखाने भरलेलं आहे. असं असतानाही काहींच्या वाट्याला जास्त दुःख येतं, पर्यायाने जास्त भोग येतात. कुणी गरिबीचा बळी ठरतो, तर कुणी आजारपणाचा, कुणाला कुणी आपलं जवळचं गमावल्याचे अतोनात दुःख होते, तर कुणाला कुठल्या अपघातात अवयव गमावून बसल्याचं दुःख येतं. त्याला आपण सामोरे जातो. पण काही दुःखे आयुष्यभर आपला छळ करत असतात. आणि त्यावर एकच उपाय असतो तो म्हणजे 'मरण'. प्राण निघून जातात तेव्हा व्याप-ताप सगळे मागे उरतात. हा शेर प्राणांतिक यातना भोगून शेवटच्या काही क्षणांत मरण आपलसं करणाऱ्या दुःखिताचा हुंकार वाटतो.

सुरेश भटांच्या गझलेत ही तडफड, त्रागा, दुःख, विवंचना तुम्हाला पावलोपावली जाणवेल आणि म्हणूनच त्यांची गझल ही सर्वसामान्यांना आपला आवाज वाटते. आता हाच शेर बघा :

ही दुनिया पाषाणांची बोलून बदलली नाही
मी बहर इथे शब्दांचे नुसतेच उधळले होते.

या शेरात कवीची दुनियेच्या प्रती असणारी हतबलता समोर येते.

मित्रहो, या गझलेतला मला आवडणारा नितांत सुंदर शेर बघा :

नुसतीच तुझ्या स्मरणांची एकांती रिमझिम झाली
नुसतेच तुझे हृदयाशी मी भास कवळले होते

'नुसतेच' हा शब्द अपुरेपण अधोरेखित करतो. कवितेची भाषा कशी असते बघा. सुरेश भट लिहिताना लिहितात की, 'स्मरणांची' रिमझिम झाली. आणि वेळ सुद्धा ते सांगून टाकतात: 'एकांतात' रिमझिम झाली. माणूस एकटा असतो, तेव्हा खरा असतो. त्याला अनेक गोष्टीचं स्मरण होत असतं. आणि डोळ्यांतून कधी अश्रू निखळतात त्याचा पत्तासुद्धा लागत नाही. ह्या चुपचाप रडू येण्याला कवी शब्द वापरतो : 'स्मरणांची रिमझिम' झाली. तर ही असते कवितेची भाषा. आणि हा गझलेचा आणि एक सुंदर आणि शेवटचा शेर पुढीलप्रमाणे :

(पृष्ठ क्र.२३ वर)

# कविता कशी समजून घ्यावी?

*कविता हा साहित्यप्रकार समजावून घेताना येणाऱ्या अडचणी व होणारा उलगडा सोदाहरण स्पष्ट करणारा ज्येष्ठ समीक्षक डॉ आनंद कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

कविता सोप्या शब्दांत लिहायची असते किंवा कविता साधी असते ही मला सरळ सरळ भूलथाप वाटते. 'कविता कळते' असं म्हणणाऱ्यांचं मला आश्चर्य वाटतं आणि हेवाही वाटतो. सहज, चालता-चालता वाचली की कळते ती खरी कविता असा समज बराच रूढ आहे. लोकांच्या मनापर्यंत पोहचते ती कविता असाही समज आहे. बरेच लोक असा साधेपणाचा, सुलभतेचा आग्रह धरतात. मोठमोठे कवीसुद्धा किती साधं-सोपं लिहितात असा उदाहरणासह तर्क देतात. पण असं म्हणणारे लोक एकतर ढोंगी असतात किंवा चुकार असतात. आपल्या आयुष्यात सरळ-साध्या पद्धतीने लिहिता येत नाहीत असे अनुभव आणि भावना असतात. म्हणून त्या व्यक्त करण्यासाठी काही वेगळी, सूचक पद्धत वापरावी लागते आणि ती म्हणजे कविता असते. पण सुलभता हाच निकष असेल तर त्यासाठी कविता कशाला हवी? सरळ, साध्या शब्दांत लिहिलं की सगळं कळतं ना! तर मग थेट गद्यंच लिहायचं. वर्तमानपत्रात लिहितात तसं सोप्प, साधं, संवादी. पण कविताही पाहिजे आणि साधी, कळणारीही पाहिजे असा हट्ट असतो याला काय करणार? कविता मनाला भुरळ कधी घालते?, झपाटून कधी टाकते जेव्हा ती अपारदर्शक असते, अनाकलनीय असते. कविता मोहक, आकर्षक केव्हा असते? जेव्हा ती खोल असते, जेव्हा तिच्यात गुंतागूंत असते !

कोणतीच कविता कधीही साधी नसते. ती कोणताच आशय-अनुभव सरळ आणि थेटपणे व्यक्त करत नाही. ती आपल्याला कळलीय असं वाटतं; पण तो आपला भ्रम असतो. कवितेचा आशय पूर्णपणे आपल्यापर्यंत येतच नसतो. तो कवितेत उरतोच. कारण तो शब्दांत पुरता कधी उतरतच नसतो. थोडं बोजड बोलायचं तर; आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर कविता अपूर्णही असते आणि अनाकलनीयही असते. त्यामुळे 'कविता कळते किंवा कळणारी असते' हा निव्वळ गैरसमज आहे.

तुम्हांला पटत नाही का? उदाहरण घेऊन बघू. ही 'खिडकीशी बसून' नावाची इंदिरा संतांची कविता बघा.

**खिडकीशी बसून**

खिडकीशी बसून, एकामागून एक
कबुतरें सोडायचीं दिगंतरावर...ओंजळींत धरून.
मनाच्या कणाकणाच्या पुड्या गळ्यांत बांधून:
आनंदाच्या. अभिनंदनाच्या. खुशालीच्या.
काळजीच्या. सांत्वनाच्या...जिथें-तिथें 'मी' च्या.

हा विश्वव्यापी पोरकटपणा
कधींतरी थांबायला हवा. खिडकी
नाहींशी व्हायला हवी. कुरतडलेल्या मनाचें निळें-निळें
आभाळ व्हायला हवें.

(गर्भरेशीम)

काय वाटलं वाचल्यावर? कविता कळतेय असं वाटतंय तुम्हाला? आपण प्रयत्न करून बघू. कविता दोन भागांत आहे. पहिल्या भागाची पहिली ओळ बऱ्यापैकी सरळ आहे, त्यामुळे कळणारी आहे. खिडकीशी बसणं, कबुतरं ओंजळीत घेऊन एकामागून एक आकाशात सोडणं हे सुरुवात म्हणून तरी कळणारं आहे. दुसरी ओळ बऱ्याच गोष्टी एकत्र आणते. मनाच्या

कणाकणाच्या पुड्या बांधल्यात. हे कणकण काय आहेत? त्यांच्या पुड्या का बांधल्या आहेत? कणकण म्हणजे मनाच्या विविध भावना/इच्छा- आनंद, अभिनंदन, खुशाली, काळजी आणि सांत्वन. ह्यांच्या पुड्या गळ्यात बांधलेल्या आहेत. जणू या 'मी' च्या विविध छटा आहेत. त्या गळ्यात बांधलेल्या आहेत म्हणजे ती बंधनं आहेत- गळ्यातलं लोढणं आहेत, मुक्त मनावर लादलेली ओझी आहेत. या सगळ्या पुड्यांमध्ये 'मी' अडकलाय आणि तो दिगंतरापर्यंत जातोय. सगळीकडे मोठा होत जाणारा 'मी'. अशी थोडी संगती लागतेय पहिल्या भागात.

दुसऱ्या भागात गोष्टी सरळ, सोप्या नाहीत. या भागातील पहिली ओळच अचानक आलेली, धूसर वाटते. तिला मागचा संदर्भ नाही. त्यामुळे तिचा नीट अर्थ लागत नाही. 'हा विश्वव्यापी पोरकटपणा' यातील 'हा' म्हणजे कोणता? पहिल्या भागात तर अशा पोरकटपणाचा कुठेही उल्लेख नाही. बरं हा पोरकटपणा म्हणजे काय आणि तो विश्वव्यापी कसा काय आहे? तो कधीतरी का थांबायला हवा? पोरकटपणा म्हणजे बालिशपणा. पोरवयातलं वेड्यासारखं/मूर्खासारखं वागणं. पण प्रौढ वयात पोरकटपणा जात असतो ना? प्रौढ झालो की आपण पोक्त होतो. मग पोरकटपणा राहात नाही. असं असूनही 'कधीतरी' असा कालवाचक शब्द का आलाय? कधीतरी आपण सगळेच पोक्त होतो, प्रगल्भ होतो. निदान तसं आपण समजतो तरी! पोक्त होण्याची प्रक्रिया तशीही बेभरवशाची असते. म्हणजे आपण कधीच प्रगल्भ होत नाही, शहाणपणं आपल्या मनाला शिवत नाही असं यातून सूचवायचं आहे का? असू शकतं. पुढची ओळ पहिल्या भागाशी सांधा जोडून देते. 'खिडकी नाहीशी व्हायला हवी'. पहिल्या भागाची सुरुवातच खिडकीपासून झाली आहे. कशाची खिडकी आहे ही? 'मी' ची खिडकी आहे. ती आपल्याला आपल्यातच कैद करून ठेवते. मोकळं होऊ देत नाही. खिडकी आपल्याला स्वार्थी भावनांमध्ये, स्वार्थी कामांमध्ये जखडून ठेवते. खिडकीबाहेरचं अथांग, निरभ्र आकाश म्हणजे मुक्ती. 'मी' च्या खिडकीमुळे आपण सगळे कशाच्यातरी बंदीवासात आहोत. आपलं जगणंच डबकं झालंय. आनंद, अभिनंदन, खुशाली, काळजी आणि सांत्वन या सगळ्यांचे आपण गुलाम झालोय. खिडकी नाहीशी झाली तर आपण खिडकीबाहेरच्या मुक्त, अमर्याद जगात जाऊ. नाही असं नाही. आपण इथं थोडं थांबायला हवं. थोडा विचार करायला हवा. खिडकी ही मुक्तता, शहाणपणं, स्वातंत्र्य, आत्मभान यांना रोखणारा, आपल्या सगळ्यांना यांच्यापासून दूर ठेवणारा अडसर आहे. तो नाहीसा झाला तर? खिडकीबाहेरचं आकाश आणि मनातलं आकाश एक होतील. हे दोन्ही आकाश कधी वेगळे नव्हतेच. 'मी' ची खिडकी आकाशामधेच कुठेतरी आली आणि मग बाहेरचं आणि आतलं असे दोन भाग झाले. हे म्हणजे अखंड वाहणाऱ्या नदीच्या पात्रात बांध घातला तर दोन भाग होतात तसं आहे. बांध हटवला की वेगळेपणं राहात नाही. सगळं एकच होऊन जातं. मग पोरकटपणा थांबतो, पोक्तपणा येतो. बरं हा पोरकटपणा काय आहे? लौकिक गोष्टीत, वागण्या-बोलण्यात सतत डोकावणारा 'मीपणा'. तो आपण मोठे झालो तरी जात नाही. उलट अधिक घट्ट होतो. मग आनंदात, अभिनंदनात, खुशालीत, काळजीत, सांत्वनात सगळीकडे 'मी-माझं' उग्रपणे मिरवत राहातं.

या कवितेतील खरी गंमत इथून पुढे आहे. म्हणजे शेवटच्या ओळीत - 'कुरतडलेल्या मनाचें निळें-निळें आभाळ व्हायला हवें.' ही ओळ म्हणजे खरी कविता आहे. अपारदर्शक, अनाकलनीय ओळ. खूप सूचक, अनेकार्थी. शब्द नेहमीचेच, रोजच्या वापरातले, पण अजिबात न कळणारे. 'कुरतडलेलं मन' हा काय शब्दप्रयोग आहे? कपडा कुरतडणं ठीक आहे; पण मन कुरतडणं म्हणजे काहीतरी वेगळंच आहे. कुरतडायला मन वस्तू आहे का? कुरतडणंच का, दुसरा शब्द वापरावा-

(पृष्ठ क्र.२१ वर)

# ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत ग्राहकाचे अधिकार

*'ग्राहक संरक्षण कायदा' हा आज प्रत्येकाला दिलेली देण आहे. कोणतीही वस्तू म्हणा अथवा सेवा इत्यादी म्हणा त्यात गुणवत्तेच्या संदर्भात भरपूर शंका असू शकतात. त्यात माणसाची फसवणूक होऊ नये किंबहुना माणूस सजग रहावा म्हणून हा कायदा समजून घेतला पाहिजे. – संपादक*

भारत सरकारने ग्राहक हक्क आणि हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी 'ग्राहक संरक्षण कायदा, (अधिनियम) २०१९' लागू केला. हा कायदा ग्राहक संरक्षण संबधीच्या अगोदरच्या कायद्यातील (१९८६) आमूलाग्र परिवर्तनासह निर्माण करण्यात आला होता. या कायद्याचा उद्देश ग्राहकांना थेट बाजारपेठेत सहभागी करून सार्वजनिक कल्याण साध्य करणे हा आहे. हा कायदा ग्राहक ही संकल्पना व परिभाषित करुण, खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील सर्व वस्तू आणि सेवा यांच्यातील त्रुटींवर भाष्य आणि उपाययोजना करते व त्यांचा समाविष्ट करते. ग्राहकांच्या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि उत्पादक, व्यापारी, विक्रेते आणि सेवा पुरवठादार यांच्याकडून होणाऱ्या शोषणाविरुद्ध लढा देण्यासाठी हे ग्राहकांच्या हातात या कायद्याचा स्वरूपात एक कायदेशीर शस्त्र लागले आहे. ग्राहक हक्क कायदा ग्राहकांना वस्तू आणि सेवा खरेदी करताना त्याबद्दल आवश्यक माहिती मागण्याचा, जाणण्याचा आणि ठेवण्याचा अधिकार प्राप्त करून देते. काही उत्पादक, विक्रेते आणि व्यापारी यांना ग्राहकाप्रती, समाजाप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदाऱ्या, कायदेशीर बंधुत्व माहीत असूनही, ते फसवणूक, अनुचित व्यापार पद्धती इत्यादींद्वारे ग्राहकांचे शोषण करू शकतात. याच प्रकारास प्रतिबंध घालण्यासाठी ह्या कायद्याचा उगम झाल्याचा दिसून येतो.

या लेखाच्या माध्यमातून ग्राहकांचे विविध अधिकार व ग्राहक संरक्षण मंच या बाबींची चर्चा करण्याचा मानस आहे. या कायद्याने ग्राहकास पुढील प्रमाणे हक्क दिले आहेत:–

## संरक्षणाचा अधिकार

ग्राहकांना संरक्षण प्रदान करण्याचे काम हा कायदा करतो, मुळात अनुचित वस्तू आणि सेवेपासून संरक्षित राहण्याचा अधिकार ग्राहकांना प्राप्त आहे. मालमत्तेसाठी आणि जीवनासाठी घातक असलेली विपणन उत्पादने, वस्तू किंवा सेवांपासून ग्राहकांना संरक्षण मिळते. विद्युत उपकरणे, गॅस सिलिंडर इ. यांसारख्या वस्तूंमधील उत्पादनातील दोष, ग्राहकांच्या आरोग्याची, जीवनाची आणि मालमत्तेची हानी/नुकसान होऊ शकते. त्यामुळे अशा वस्तू किंवा सेवा या योग्य प्रकारे ग्राहकांच्या दारापर्यंत पोहचवून त्या संरक्षित करण्याची जबाबदारी पुरवठादारावर आणि संरक्षित राहण्याचा अधिकार ग्राहकांना प्राप्त आहे. म्हणून ग्राहकांनी कुठलीही वस्तू खरेदी करण्यापूर्वी त्या वस्तुची हमी आणि गुणवत्ता यावर आग्रह धरावा. ग्राहकांनी AGMARK किंवा ISI इ. मान्य वस्तू किंवा उत्पादन निवडावे. या संस्था वस्तुची पारख करून, नियमाप्रमाणे त्याची गुणवत्ता आहे की नाही याची शहानिशा करतात, म्हणून ग्राहकांना अशा संस्था मान्यताप्राप्त असलेल्या वस्तू घेण्यास एक प्रकारची खात्री प्राप्त होते.

## माहितीचा अधिकार

हा कायदा ग्राहकांना माहिती मिळण्याचा अधिकार प्रदान करतो. अनुचित व्यापार पद्धतींपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी उत्पादने, वस्तू किंवा सेवांचे प्रमाण, गुणवत्ता, मानक, शुद्धता, सामर्थ्य आणि किंमत याबद्दल माहिती दिली पाहिजे. विक्रेते किंवा उत्पादकांनी खरेदीदार

किंवा ग्राहकांना सर्व आवश्यक उत्पादन तपशील प्रदान केले पाहिजेत, जेणेकरून ते वस्तू खरेदी करताना ग्राहक हुशारीने वागू शकतील. उत्पादकांनी उत्पादनाच्या लेबलवर आणि पॅकेजवर सर्व संबंधित माहिती देणे आवश्यक आहे. तसा अधिकार हा कायदा ग्राहकांना प्रदान करतो. वस्तुची माहिती वस्तूवर किंवा वस्तूच्या पॅकेट वर असेल तर (किंवा त्या कंपनीच्या वेबसाइटवर असेल तर) ग्राहकांना त्या वस्तू विषयी माहिती तर मिळतेच; पण ती घ्यायची किंवा न घ्यायची अशी स्वत:ची कारणेही कळतात. शेवटी ग्राहकांचे समाधान हा या कायद्याचा मूळ गाभा आहे.

### निवडण्याचा अधिकार

निवडीचा अधिकार ग्राहकांना स्पर्धात्मक किंमतींवर विविध उत्पादने, वस्तू किंवा सेवांमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार देतो. स्पर्धात्मक किंमत म्हणजे वाजवी किंमत. विक्रेते, किरकोळ विक्रेते किंवा व्यापारी ग्राहकांना विशिष्ट ब्रँडच्या वस्तू खरेदी करण्यास भाग पाडू शकत नाहीत. ग्राहक त्यांच्या दृष्टिकोनातून त्यांना योग्य वाटणारा ब्रँड निवडू शकतात. निवडीचा अधिकार खात्री देतो की, मक्तेदारीच्या बाबतीत ग्राहकांना वाजवी किंमतीत चांगली गुणवत्ता आणि सेवा दिल्या जातात. त्यात मूलभूत सेवा आणि वस्तूंचाही समावेश आहे.

### सुनावणीचा अधिकार

सुनावणीचा अधिकार ग्राहकांच्या हिताची खात्री देतो आणि योग्य मंचावर त्याचा विचार केला जातो. ग्राहकांना त्यांचे मुद्दे संबंधित ग्राहकमंचावर मांडण्यासाठी पुरेसे माध्यम असेल आणि त्यांच्या हिताचा विचार केला जाईल याची शाश्वती हा कायदा देतो. विक्रेत्याच्या अनुचित व्यापार पद्धतींच्या बाबतीत ग्राहक योग्य मंचावर तक्रार दाखल करू शकतात. योग्य मंच त्यांना ग्राहकांना त्यांच्या तक्रारी मांडण्याची वाजवी संधी देतो. या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी ते ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी स्थापन केलेल्या ग्राहक संस्थांची मदत घेऊ शकतात.

### निवारणाचा अधिकार

ग्राहकांना प्रतिबंधात्मक व्यापार पद्धती, अनुचित व्यापार पद्धती किंवा ग्राहकांच्या अनैतिक शोषणाविरुद्ध उपाय योजनांचा अधिकार आहे. यात ग्राहकांच्या तक्रारींचे योग्य निराकरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे. ग्राहकाकडे जर कायदेशीर तक्रार असल्यास योग्य त्या ग्राहक मंचासमोर तक्रार दाखल करू शकतात. ते विविध ग्राहक संस्थांच्या मदतीने त्यांच्या समस्यांचे निराकरण देखील करू शकतात. नुकसान भरपाई मागू शकतात, सदोष वस्तूंची दुरुस्ती किंवा ग्राहकांच्या समस्येनुसार वस्तू बदलणे या सर्वांचा यात समावेश होतो.

### ग्राहक शिक्षणाचा अधिकार

ग्राहक शिक्षणाचा हक्क म्हणजे शोषण टाळण्यासाठी ग्राहकांना हक्कांची जाणीव व्हावी म्हणून जागृतीच्या माध्यमातून ग्राहकापर्यंत पोहोचवलेली माहिती. या अधिकारांतर्गत, ग्राहकाला माहितीपूर्ण ग्राहक होण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान प्राप्त करण्याचा अधिकार आहे. जेव्हा ग्राहकांना त्यांचे हक्क माहीत असतात, तेव्हा त्यांच्या संरक्षणासाठी विद्यमान कायदे आणि संघटना योग्य ती कारवाई करू शकतात. शालेय अभ्यासक्रम आणि विद्यापीठ अभ्यासक्रमांमध्येही सरकारने ग्राहक शिक्षणाचा समावेश केला आहे. तसेच, जाहीरातीच्या माध्यमातून ग्राहक जागे व्हावे म्हणून प्रयत्न केला जातो.

जेव्हा जेव्हा ग्राहकांच्या हक्काचे उल्लंघन होते त्या वेळी ग्राहक या कायद्याद्वारे स्थापित मंचाकडे तक्रार दाखल करू शकतात. ग्राहक संरक्षण कायदा, २०१९,

ग्राहक हक्कांचे संरक्षण आणि अंमलबजावणी करण्यासाठी 'ग्राहक विवाद निवारण आयोग' स्थापन करण्याची तरतूद करतो. ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर निवारण संस्था स्थापन करण्याची तरतूद या कायद्यात आहे. उत्पादक किंवा विक्रेते ग्राहकांची फसवणूक करणार नाही आणि ग्राहकांना फसवणूक किंवा शोषणापासून संरक्षण मिळावे यासाठी हा कायदा ग्राहकांना हक्क देतो. योग्य किंमतीत योग्य वस्तू खरेदी करण्यासाठी आणि नुकसान किंवा दुखापत कशी टाळायची हे जाणून घेण्यासाठी ग्राहकांनी देखील खबरदारी घेतली पाहिजे. ग्राहक हक्कांसोबतच, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि योग्य उपाय आणि भरपाई मिळवण्यासाठी त्यांना जाणून घेणे देखील आवश्यक आहे.

जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोग त्याच्या तक्रारींचा निपटारा करते, जेथे वस्तू किंवा सेवांची किंमत १ कोटी रुपयांपेक्षा कमी आहे. परंतु महाराष्ट्रात ही मर्यादा ५० लाखांची आहे. राज्य आयोग जिल्हा आयोगाने दिलेल्या आदेशांवरील अपील आणि वस्तू किंवा सेवांचे मूल्य १ कोटी रुपयांपेक्षा जास्त, परंतु १० कोटी रुपयांपेक्षा कमी असलेल्या तक्रारी हाताळतो. वस्तू आणि सेवांचे मूल्य १० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्यास राष्ट्रीय आयोग तक्रारींची दखल घेते.

ग्राहकांनी स्वत:ही काळजी घ्यावी, वस्तूची पारख करून ती खरेदी करावी. कुठलीही वस्तू किंवा सेवा पक्क्या पावती शिवाय खरेदी करू नये, वॉरंटी कार्ड जपून ठेवावे. वस्तू व सेवेसंबधी काही तक्रार असल्यास योग्य वेळेत ग्राहक - मंचासमोर केस दाखल करावी.

**- प्रा. विनोद एच वाघ**

विप्रमंचे टिएमसी विधी महाविद्यालय, ठाणे

•••

(पृष्ठ क्र.१८ वरून - **कविता कशी समजून घ्यावी?**)

फाडणं, दुखावणं, दुभंगणं, तोडणं. आपण मनाला 'वस्तू केलंय. मनाचं वस्तूकरण झालंय. त्याचं प्रवाहीपण थांबलंय, थिजून गेलंय. 'मी-माझे' च्या खिडकीपाशी मन जेरबंद होऊन बसलंय, साचून राहिलंय. कुरतडण्यात हळूहळू नष्ट होणं आहे. हळूहळू सत्त्व गमावणं आहे, हळूहळू परतंत्र होणं आहे. असं स्वत:पासून हळूहळू वेगळं होण्यात गमावण्याची तीव्र आणि दीर्घकाळ चालणारी वेदना आहे. जणू आयुष्यभर 'मीपणा'ने आपलं मन कुरतडलेलं आहे. आपल्याला मोकळं होताच आलं नाही, व्यापक होताच आलं नाही. स्वार्थाचे साखळदंड सुटलेच नाहीत, मनाची हाव कमी झालीच नाही. मग अथांग, अमर्याद आकाश कसं मिळणार? हे 'निळे निळे आभाळ होणं' हा शब्दसमूह या कवितेला सर्वाधिक धूसर, अनाकलनीय करतो. काहीच स्पष्ट आणि सरळ नाही. आभाळ निळंच आहे. पण प्रत्येकाची निळं होण्याची प्रक्रिया वेगळी आहे, प्रत्येकाच्या आभाळाचा प्रकार वेगळा आहे. सगळ्यांचं निळं निळं आभाळ व्हायचं असेल तर कुरतडलेलं मन मोकळं झालं पाहिजे. मन मोकळं होण्यासाठी 'मीपणाची' खिडकी नाहीशी झाली पाहिजे. हे 'होणं' आहे- आमूलाग्र बदलाची अवघड प्रक्रिया. बाहेरची टरफलं टाकून स्वत:ला घट्ट मिठी मारण्यासारखं आहे हे. हे स्वत:ला ओळखणं आहे आणि ह्याच्याइतकं जगात अवघड काय आहे?

काय वाटतं तुम्हाला हे वाचून? कविता साधी-सोपी असते? नसतेच. म्हणूनच ती कायम आकर्षक असते!

**- डॉ. आनंद कुलकर्णी**

इंग्रजी विभाग प्रमुख

ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव

ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

# स्वामी विवेकानंद यांची १६१ वी जयंती

*१२ जानेवारी २०२४ रोजी स्वामी विवेकानंदांची १६१ वी जयंती साजरी झाली. प्रस्तुत लेखात विवेकानंदांच्या इंग्लंडमधील प्रवासाबद्दल लंडन येथील इतिहासकार श्री संकेत कुलकर्णी यांनी प्रकाश टाकला आहे – संपादक*

कलकत्त्याला जन्मलेल्या स्वामीजींची जगभरात कीर्ती झाली ती ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो शहरात भरलेल्या सर्वधर्मीय परिषदेमुळे हे तर सर्वश्रुत आहेच. तेथे त्यांनी, 'अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो' अशी भाषणास सुरुवात केली आणि सभेसाठी जमलेल्या सुमारे सात हजार लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ह्याच सभेला हेन्रिएटा म्युलर नावाच्या एक ब्रिटिश बाईही उपस्थित होत्या. त्या थिऑसॉफीवर व्याख्यान द्यायला तिथे आलेल्या होत्या. त्या विवेकानंदांचे वेदान्तावर व भारतीय संस्कृतीवरचे विचार ऐकून खूप प्रभावित झाल्या. ह्या म्युलर बाई वयाने मोठ्या होत्या; पण सुधारित विचारांच्या होत्या. बाईंनी त्या काळात अक्षोयकुमार घोष नावाच्या भारतीय मुलाला दत्तकही घेतलेले होते. तोही विवेकानंदांचा चाहता होता. अक्षोयला सांगून म्युलरबाईंनी विवेकानंदांना इंग्लंडमध्ये यायचे आमंत्रण दिले. त्यानुसार स्वामीजी अमेरिकावारी आवरताना न्यू यॉर्कवरून एसएस तुरीन नावाच्या बोटीने पॅरीसला आणि तिथून पुढे १० सप्टेंबर १८९५ रोजी लंडनला आले. दोन-अडीच महिने इथे वेगवेगळ्या ठिकाणी मुक्काम करत आणि भारतीय संस्कृतीबद्दल प्रवचनं देत २७ नोव्हेंबर १८९५ रोजी ते पुन्हा आरएमएस ब्रिटानीक नावाच्या बोटीने न्यूयॉर्कला निघून गेले.



(स्वामीजी १८९६ मध्ये लंडनमध्ये आले असताना इथे आल्फ्रेड एलिस नावाच्या फोटोग्राफरने त्यांचा काढलेला फोटो.)

१५ एप्रिल १८९६ रोजी एसएस जमनिक नावाच्या बोटीने स्वामीजी न्यू यॉर्कवरून पुन्हा लिव्हरपूलला आले. तिथून पुन्हा वेगवेगळ्या ठिकाणी प्रवचनं देत मे १८९६ मध्ये ते लंडनला आले. तिथेच १३ जुलै १८९६ रोजी त्यांच्या राजयोगावरच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. १९ जुलै १८९६ रोजी स्वामीजी युरोप दौऱ्यावर निघून गेले. सुमारे दोन महिन्यांनी यशस्वी युरोप दौरा करून ते १७ सप्टेंबर १८९६ मध्ये पुन्हा लंडनला परत आले. सुमारे तीन महिने लंडनमध्ये काढून १६ डिसेंबर १८९६ रोजी ते इटलीमार्गे भारतात निघून गेले.




(लंडनमधील सेंट जॉर्जेस ड्राईव्हवरील ज्या घरात स्वामीजी १८९६ मध्ये रहात होते त्यावर 'इंग्लिश हेरीटेज'ने त्यांच्या नावाची लावलेली पाटी)

जीवन हा हास्य आणि अश्रू यांचा सुरेख संगम आहे.

ह्यानंतर अजून एकदा स्वामीजी इंग्लंडमध्ये आले. २० जून १८९९ रोजी कलकत्त्यावरून निघालेल्या एसएस गोलकोंडा बोटीने निघून ३१ जुलै १८९९ रोजी स्वामीजी लंडनला पोहोचले. सुमारे दोन आठवडे मुक्काम करून ते १७ ऑगस्ट १८९९ रोजी एसएस नुमिडीयन नावाच्या बोटीने ग्लासगोवरून न्यू यॉर्कला निघून गेले.

इंग्लंडला स्वामीजी तीनदा आले. इथे सुमारे तीस – बत्तीस वेगवेगळ्या ठिकाणी ते राहिले. इथे त्यांनी वेदान्तावर प्रवचनं दिली. ज्या भारतीयांवर इंग्रज राज्य करत होते त्याच भारतीय संस्कृतीची इंग्रजांना नव्याने ओळख करून दिली. भारतालाही जगाकडे काहीतरी देण्यासारखे आहे आणि जगाने भारताकडून काहीतरी शिकण्यासारखे आहे ह्या गोष्टींची पाळंमुळं स्वामीजींनी जगभरात – खासकरून स्वतःला 'सुसंस्कृत' म्हणवणाऱ्या पाश्चिमात्य जगात रुजवली. त्यांच्या ह्या कार्याला तोड नाही.

स्वामीजी राहिलेल्या तीस – बत्तीस ठिकाणांचे इथले पत्ते मी वेगवेगळी कागदपत्रं अभ्यासून आणि तपासून शोधून ठेवलेले आहेत. काही वास्तू आणि पत्ते अजूनही शिल्लक आहेत. काही पत्ते आता नाहीत, पण त्या जागा नक्की केलेल्या आहेत. वेळ मिळाला की इथे एकदा 'स्वामी विवेकानंद रोड ट्रीप' करायचा माझा विचार आहे. ब्रिटनमध्ये ज्या ज्या ठिकाणी स्वामीजी गेले त्या त्या ठिकाणी भेट द्यायची आहे. त्या जागा प्रत्यक्ष पहायच्या आहेत. स्वामीजींच्या कार्यक्षेत्रांसमोर – जिथे जिथे ते प्रत्यक्ष राहिले आणि वावरले त्या वास्तूंसमोर नतमस्तक व्हायची इच्छा आहे.

कधी जमतंय – कसं जमतंय बघू या. पण आज स्वामीजींच्या जयंतीनिमित्ताने त्यांना शत शत प्रणाम!

**– संकेत कुलकर्णी (लंडन)**

•••

(पृष्ठ क्र.१६ वरून – **ऋतू कवितेचे – भाग १**)

मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत होतो
मी विझलो तेव्हा सारे आकाश उजळले होते....

प्रत्येक जण कुठली तरी आशा ह्याशी जपत, डोळ्यांच्या दिव्यातली स्वप्नांची वात तेवत ठेवत असतं. आणि एक दिवस जेव्हा आपण विझून जातो, संपून जातो, तेव्हा आकाश उजळतं. म्हणजेच आपलं काम, आपलं कर्तृत्व मागे उरत असतं. चांगुलपणावर विश्वास ठेवत आपण आपली वाट चालत राहिलो तर कितीही दुःख आणि निराशेचे क्षण येवोत, आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात आपलं स्वतःचं आकाश एक ना एक दिवस उजळल्याशिवाय राहणार नाही. आणि याचं एका सुंदर नोट वर आपण इथे थांबू, मात्र पुढच्या भागात नक्की भेटू, एका नवीन कवितेसह. तोपर्यंत निरखत रहा 'ऋतू कवितेचे' धन्यवाद !

**– श्रीपाद जोशी**

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**आंतरराष्ट्रीय** Spell Bee **परीक्षेचा निकाल**

**स्तर दुसरा – राज्यस्तरीय स्तर**

Spell Bee च्या राज्यस्तरावर झालेल्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी भरघोस यश मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

Spell Bee परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे–

कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, १९ विद्यार्थ्यांनी संपादन श्रेणी प्राप्त केली आहे. त्यांची यादी खालीलप्रमाणे आहे. तर १४ विद्यार्थी उत्कृष्ट श्रेणीत आले आहेत.

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. शुभा उतेकर | १ली | ९९ |
| २ | कु. नियांश निखिल गंद्रे | १ली | ९७ |
| ३ | कु. सारा गौरव वैद्य | १ली | ९७ |
| ४ | कु. ओजस्वी महाडीक | १ली | ९७ |
| ५ | कु. आर्वी नवरे | १ली | ९६ |
| ६ | कु. अनुश्री अक्षय बापये | १ली | ९२ |
| ७ | कु. स्वरांग विरकर | १ली | ९१ |
| ८ | कु. तेजश्री संतोष सोहनी | १ली | ९१ |
| ९ | कु. आयूर जयवंत औटी | २री | ९२ |
| १० | कु. मेहेक शितूत | २री | ९१ |
| ११ | कु. अन्वी अमित कामत | ३री | ९१ |
| १२ | कु. हिमानी मिलिंद दीपनाईक | ४थी | १०० |
| १३ | कु. ओजस प्रकाश घाग | ४थी | ९९ |
| १४ | कु. अद्वैत वझे | ४थी | ९७ |
| १५ | कु. सान्वी कार्तिक मूडबिद्री | ४थी | ९४.७५ |
| १६ | कु. रेवा सचिन पिंपळे | ४थी | ९४ |
| १७ | कु. युक्ता धीरज झगडे | ४थी | ९३ |
| १८ | कु. ओजस्वी उदयसिंह जाधव | ४थी | ९१ |
| १९ | कु. स्वानंद स्वप्निल बेलोसे | ४थी | ९० |

**राष्ट्रीय गणित दिवस**

थोर गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या स्मरणार्थ साजरा करण्यात येणारा राष्ट्रीय गणित दिवस प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी अगदी जल्लोषात साजरा केला.

शिक्षकांनी वेगवेगळे उपक्रम इ.१ली ते ४थी च्या वर्गात राबविले. ते पुढीलप्रमाणे –

* इ. १ली च्या विद्यार्थ्यांनी अंकांपासून वेगवेगळी चित्रे काढली.
* इ. २री च्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या नक्षी, मणी इ. वापरून छानसे आकृतीबंध तयार केले.
* इ. ३री च्या विद्यार्थ्यांनी वर्तुळ व चौकोनी आकाराची टाकाऊ वस्तूचा वापर करून छान सुशोभित घड्याळे तयार केली.
* इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी कल्पकता वापरून सुंदर अबेकस प्रतिकृती तयार केल्या.

विद्यार्थ्यांनी गणिताचे महत्त्व, दैनंदिन जीवनातील गणिताचे उपयोग, श्रीनिवास रामानुजन यांची माहिती सांगितली. एका विद्यार्थ्याने पाढ्यांचे एक सुरेल गाणे सादर केले.

## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

**दि. १२ डिसेंबर २०२३**

सांगाड्यांच्या विश्वातील सफर.. ठाणे येथील प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतर्फे दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी 'Anthropology for Archaeology: An Introduction' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, या व्याख्यानाच्या प्रमुख वक्त्या डॉ. वीणा मुश्रीफ-त्रिपाठी डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅजूएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे येथे प्राध्यापिका आहेत. मानववंशशास्त्र, व पुरातत्वशास्त्र याविषयी त्यांचा अभ्यास आहे. डेक्कन कॉलेज व अनेक नामांकित संस्थांच्या उत्खनन उपक्रमात त्यांचा सहभाग असतो.

हे व्याख्यान विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. वा. ना बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतील पाणिनी सभागृहात पार पडले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला प्राच्यविद्या अभ्यास संस्थेने इतिहास व भारतीय संस्कृती जपण्यासाठी, विद्यार्थ्यांमधे संशोधक वृत्ती रुजवण्यासाठी व जनमानसात यांविषयी जागरूकता पसरविण्यासाठी हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची ओळख करून देण्यात आली.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, प्राच्यविद्या अभ्यास संस्था अनेक व्याख्यान, प्रदर्शन, हेरिटेज वॉक अशा अनेक विविध उपक्रमांचे आयोजन करत असते. लवकरच प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतर्फे मानववंशशास्त्र आणि पुरातत्वशास्त्राशी संबधीत एक नावीन्यपूर्ण कोर्स सुरू होणार आहे, ज्यात विद्यार्थ्यांना दफनभूमीची उत्खनन पद्धती आणि त्यात मिळणाऱ्या मानवी हाडांच्या अभ्यासाविषयीचे विशेष प्रशिक्षण देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.

इतिहास, भारतीय संस्कृती, मानववंशशास्त्र या विषयी विद्यार्थ्यांमध्ये रुची निर्माण व्हावी आणि यासंबंधी त्यांना तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन लाभावे या हेतूने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, अनेक विद्यार्थी, प्राध्यापक, व ठाण्यातील प्रतिष्ठित नागरिक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. व्याख्यानानंतर प्रश्न-उत्तर सत्र पार पडले व कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

महाविद्यालयीन जीवनात सांस्कृतिक प्रगतीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. ठाणे मुंबईतील अनेक महाविद्यालयात आयोजित केल्या जाणाऱ्या महोत्सवांना विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळतो. विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेला असाच एक महोत्सव म्हणजे जोशी बेडेकर महाविद्यालयातील ‘नवरंग महोत्सव’ होय! असे म्हणतात की, ‘यशस्वी शिक्षण हा यशस्वी जीवनाचा पाया आहे’ पण शिक्षण हे केवळ अकेडमिक स्टडी पुरते मर्यादीत नाही हे ज्यांना कळले त्यांनी यशाची शिखरे सर केली आहेत. म्हणूनच अकैडमी स्टडी बरोवरच विद्यार्थ्यांच्या इतर कलागुणांना देखील वाव मिळावा याकरिता आज शिक्षणक्षेत्रात अनेक बदल घडवले जात आहेत.

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) ठाणे गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व घडावे यासाठी कार्यरत आहे. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, मंडळाचे सदस्य डॉ. महेश बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे खंभीर नेतृत्व लाभल्यामुळे जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध क्षेत्रांत यक्षाची शिखरे सर करीत आहेत. विद्यार्थ्यांमधील क्षमतांचा शोध घेऊन त्यांना विविध संधी उपलब्ध करून देणाऱ्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा

नाईक यांच्यामुळे जोशी बेडेकर कॉलेजचे नाव आदराने घेतले जाते. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP) नवे नवे बदल घडत आहेत. 'विद्यार्थी केंद्री शिक्षण' हा गाभा अधिक मजबूत होत आहे. विद्यार्थ्यांचा डे स्वयंपूर्ण होण्यासाठी नवरंग सारखे महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावतात. गेली तीस वर्षे जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांकरिता 'नवरंग' महोत्सवाचे आयोजन करीत आहे. नावाप्रमाणेच हा महोत्सव विद्यार्थ्यांची प्रतिभा नवरंगांनी सजवण्याचे कार्य अविरतपणे करत आहे. नवरंग महोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा, तसेच त्यांच्या कला-कौशल्यांचे सादरीकरण करण्यासाठी मंच उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे, वर्षभर अभ्यासात अडकलेले विद्यार्थी काही क्षण स्वतःच्या कलाकौशल्यांवर लक्ष केंद्रित करू शकतात.

त्यानंतर उर्वरित स्पर्धा देखील घेण्यात आल्या ज्यात पर्सनालिटी कॉम्पिटिशन हुल्य हुए, शेप अप या स्पर्धांचा समावेश होतो. वरील स्पर्धांना देखील विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. नवरंग किंग, नवरंग क्वीन, नवरंग प्रिन्स आणि नवरंग प्रिन्सेस या नावाने गौरवण्यात आले, याच दिवशी महाविद्यालयात साडी डे व टाय डे देखील आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्वत्र उत्साहाची लाट पाहायला मिळाली. सर्वच विद्यार्थी आपापल्या फोनमध्ये ह्या नवरंगच्या आठवणी फोटो आणि सेल्फीच्या माध्यमातून साठवत होते. डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे 'संस्कृती से समृद्धी तक' तक या संकल्पनेवर आधारित होता. नवरंग महोत्सव विद्यार्थ्यांनी मोठ्या जल्लोषात आणि शिस्तबद्धरीत्या साजरा केला.

महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये द्विधा मनस्थिती पाहायला मिळाली. ज्यात एकीकडे विद्यार्थी वर्तमान कार्यक्रमांचा आस्वाद घेत होते आणि दुसरीकडे नवरंग महोत्सवाचा समारोप म्हणून वाईट देखील वाटत होते. अखेर मनात नसतानाही कार्यक्रमाचा समारोप झाला, नवरंग महोत्सवाच्या सर्वच समित्यांनी अथक परिश्रम घेऊन हा नवरंग महोत्सव यशस्वी केला ही बाब अतिशय कौतुकास्पद आहे. अगदी कनिष्ठ महाविद्यालया पासून मी नवरंग अनुभवत आहे आणि दिवसेंदिवस नवरंग माहीला अधिकाधिक युध्दीमत आनंददायी प्रतिभांनी नवरंग अधिक बहरतो, साजतो. ह्या वर्षीचा नवरंग तर पार पडला पण मनात मात्र पुन्हा ओढ वाटू लागली ती पुढच्या नवरंग समारंभाची...

**१५ डिसेंबर ते २१ डिसेंबर**

राष्ट्रीय सेवा योजनेचे समाजसेवेसाठी स्वयंसेवकांचे व्यक्तिमत्त्व आणि चारित्र्य विकसित करणे आणि सामाजिक जबाबदारी आणि सहानुभूतीची भावना वाढवणे हे एक ध्येय आहे. वरील उद्दिष्टांच्या आधारे जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या NSS युनिटने दत्तक गावात म्हणजे उंबरमाळी येथे NSS निवासी शिबिराचे आयोजन केले. NSS निवासी शिबिराचे प्राथमिक उद्दिष्ट स्वयंसेवकांना सामुदायिक सेवा कार्यात सहभागी करून घेणे आहे. १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर या कालावधीत खालील उपक्रम राबविले गेले.

१. शारीरिक तंदुरुस्ती : शारीरिक तंदुरुस्तीवर व्यावहारिक सत्रे

२. स्वच्छता ड्राइव्ह

३. शाळेत शिकवणे

४. आरोग्य आणि स्वच्छता शिक्षण

५. कौशल्य विकास

६. टीम लीडिंग आणि सौहार्द

८. सामाजिक एकात्मता

९. वैयक्तिक वाढ आणि प्रतिबिंब

**१ डिसेंबर ते १५ डिसेंबर**

महाविद्यालयाच्या NSS unit ने दिनांक ११ डिसेंबर ते १५ डिसेंबर ह्या कालावधीत पोलिओ ड्राईव्ह आयोजित केला. ह्यात NSS च्या एकूण २० स्वयंसेवकांचा सहभाग होता. ह्या ड्राईव्ह मध्ये पोलिओ लसीकरण मोहीम समाविष्ट असून, त्याचे उद्दिष्ट 'पोलिओ निर्मूलन' हे आहे.

महाविद्यालयाच्या NSS UNIT ने पोलिस रेसिंग डे हा उपक्रम दिनांक ५ जानेवारी २०२३ रोजी केला. ज्यात एकूण ५० स्वयंसेवकांची उपस्थिती होती. पोलिस रेसिंग डे हा पोलिस दलाचा वर्धापन दिन असून हा दिवस आजच्या तरुणवर्गाला पोलिस दलाने आयोजित केलेल्या सन्मान समारंभास उपस्थित राहण्याची संधी देतो तसेच त्यांच्या बलिदानांचे महत्त्वही सांगतो.

महाविद्यालयाच्या विवेकानंद स्टडी सर्कल, तत्त्वज्ञान विभाग आणि BMS विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, ९ जानेवारी, २०२४ रोजी रामकृष्ण मिशन मठ, सकवार पालघरला क्षेत्र भेट आयोजित केली. ह्यास एकूण ४५ विद्यार्थी उपस्थित होते. ह्या कार्यक्रमाचा उद्देश स्वामी विवेकानंदांची मूल्ये आणि रामकृष्ण मिशनचे कार्य तरुणांच्या मनात रुजवणे, तसेच विद्यार्थ्यांना मानव आणि इतर सजीव सहसंबंध समजावून देणे हा होता.

**दिनांक ३ जानेवारी**

महिला सक्षम समिती WDC तर्फे दिनांक ३ जानेवारी रोजी सावित्री बाई फुले जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालायाच्या प्राध्यापिका डॉ. श्वेता अहिरे यांनी उपस्थितांना संबोधित केले.

**दिनांक ५ जानेवारी**

इतिहास आणि संस्कृत या दोन्ही विभागांच्या विद्यमाने आंतर-राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्याकरिता दिनांक ५ जानेवारी रोजी curtain raiser करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध निवेदिका आणि अभिनेत्री डॉ समीरा गुजर-जोशी प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. डॉ. समीरा गुजर यांनी 'प्राचीन नाट्यशास्त्र आणि आधुनिक नाटक' या विषयावर आपले विचार मांडले. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचा आणि विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येत सहभाग होता.

५ जानेवारी रोजी एन एस एस समितीने पोलिस रेसिंग डे चे आयोजन केले होते. हा दिवस पोलिसांच्या शक्तीचा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यात पोलिसांनी विद्यार्थ्यांना विविध माहिती दिली.

**दिनांक ६ जानेवारी**

Evolving Knowledge and Education System in India: Ancient to Contemporary Times या संकल्पनेवर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी वि. प्र. मंडळाचे डॉ. विजय बेडेकर यांनी दृक श्राव्य पद्धतीने आपले मनोगत व्यक्त केले, तसेच प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच परिषदेचे उद्घाटक म्हणून डॉ. विनय सहस्रबुद्धे लाभले होते.

**परिषदेचा अहवाल :-** ज्ञानामृत देणारी राष्ट्रीय परिषद जोशी-बेडेकर महाविद्यालयात संपन्न.

दिनांक ६ जानेवारी रोजी जोशी बेडेकर महाविद्यालयात राष्ट्रिय परिषद इतिहास व संस्कृत विभागांनी संयुक्तपणे आयोजित केली. या परिषदेची सुरुवात दीप प्रज्वलन व पुरुषसुक्तानी झाली. मग महाविद्यालयातील डॉ. सुजा अब्राहम यांनी सर्व प्रमुख अतिथी व मान्यवर यांचे स्वागत केले. मग या परिषदेचे संयोजक व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुभाष शिंदे यांनी सर्वांना संबोधित केले. त्यांनी नव्या शैक्षणिक धोरणाला लक्षात घेऊन या परिषदेचा विषय कसा निवडला आहे ते सांगितले. मग

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी सर्वांना संबोधित केले. त्यांनी कोणतीही क्रांती घडण्याआधी इतिहासात प्रत्येकवेळी आधी शिक्षणात क्रांती घडली या गोष्टीकडे लक्ष वेधले. तसेच, आपण केवळ प्राचीन भारतीय ज्ञान प्रणाली केवळ पुनर्जीवित न करता त्याची पुनर्रचना देखील केली पाहिजे असे म्हटले. यावेळी त्यांनी जोशी बेडेकर महाविद्यालय व विद्या प्रसारक मंडळ हे विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे म्हटले. त्यानंतर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.विजय बेडेकर यांनी व्हिडिओ द्वारे सर्वांना आशीर्वाद दिला. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी पुढील वर्षाच्या परिषदेच्या संकल्पनेचे(थिम) उद्घाटन केले. पुढील वर्षीची थिम(संकल्पना) 'खादी– आत्मनिर्भरता से प्रगती तक' आहे.

प्रमुख अतिथी डॉ.विनय प्रभाकर सहस्त्रबुद्धे यांनी उद्घाटनात भाषण केले. डॉ.विनय प्रभाकर सहस्त्रबुद्धे हे भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, नवी दिल्ली याचे प्रमुख आहेत. यात बोलताना त्यांनी स्वभाषा, स्वभूषा व स्वदेश ही त्रिसूत्री जपणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. त्याचसोबत त्यांनी प्रादेशिक भाषा जपणे महत्त्वाचे आहे यावर ही भर दिला. भारतीय संस्कृतीत आपला विश्वाकडे बघण्याचा वेगळा दृष्टीकोन असल्याने भारतीय संस्कृती ही शाश्वत असल्याचे नमूद केले. तसेच 'वसुधैव कटुम्बकम्' ही विचारधारा केवळ भारतीय संस्कृती मध्ये असल्याचे म्हटले. त्यांनी ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ व अविभाज्य घटक असल्याचे महत्त्वपूर्ण विधान केले. त्यांनी भारतीय संस्कृती ही प्राचीन असून अजून पर्यंत टिकण्यामागाचे रहस्य भारतीय तत्त्वज्ञानाचे १० सिद्धांत असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी त्या सिद्धांतांबद्दल सविस्तर माहिती देखील सांगितली. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते डॉ. बेणुधर चिनारा यांनी भारतीय शिक्षण व भविष्यात करावयाचे बदल याबद्दल भाष्य केले. त्यांनी बहुशाखीय क्लस्टर संस्था स्थापन करण्यावर भर दिला पाहिजे असे सूचित केले. यानंतर इंद्रायणी रॉय यांनी या उद्घाटन समारंभात सर्वांचे आभार मानले.

यानंतर प्लेनरी सेशन – १ चा आरंभ झाला. यात दोन विदेशी वक्त्यांना आमंत्रित केलेले हे सत्र डॉ. नमिता निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्या मुंबई विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागात प्राध्यापिका आहेत. या सत्रातील पहिले वक्ते डॉ. कोनराड एल्स्ट होते. ते विख्यात विद्वान व लेखक आहेत. ते एकविसाव्या शतकातील 'बौद्ध धर्माची प्रासंगिकता' या विषयावर बोलले. या सत्रातील दुसरे वक्ते डॉ.लुसी गेस्ट होते. त्या योगच्या ब्रह्मर्षी शाळेच्या सहसंस्थापक व गुरुकुलम आंतरराष्ट्रीय वर्गाच्या संस्थापिका आहेत. तसेच त्या काशी योग महोत्सवाच्या संस्थापक आहेत. त्यांनी वेद, उपनिषद व शास्त्रांनुसार स्थिर ज्ञानामागचे विज्ञान सांगितले. दोन्ही वक्त्यांची भाषणे ही प्रभावी व माहितीपूर्ण होती. त्यानंतर प्रश्न सत्र झाले. ज्यात श्रोत्यांनी काही प्रश्न विचारले व वक्त्यांनी उत्तरे दिली.

यानंतर पॅनल चर्चा सत्र झाले. त्याचा विषय 'भारतीय ज्ञान व शिक्षण: आजच्या काळातील नव्या शैक्षणिक धोरणाला लक्षात घेऊन उपयुक्तता' हा होता. या चर्चेचे पॅनलिस्ट डॉ. मंजिरी भालेराव, डॉ. प्रसाद भिडे, डॉ. मौसमी चौधरी, डॉ. श्रीनंद बापट होते. डॉ. मंजिरी भालेराव या टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे प्राध्यापिका आहेत. डॉ. प्रसाद भिडे हे भोपाळ मधील केंद्रीय संस्कृत विद्यापीठात ६ नाट्यशास्त्र अनुसंधान केंद्र इथे सहयोगी प्राध्यापक व प्रमुख आहेत. डॉ.मौसमी चौधरी या आसाम मधील दिफू सरकारी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागात सहाय्य प्राध्यापिका आहेत. डॉ. श्रीनंद बापट हे पुणे येथील भांडारकर प्राच्यविद्यालयात रजिस्ट्रेटर व क्युरेटर आहेत. या सत्राचे नियंत्रक डॉ. नीतिन जोशी होते. ते ठाणे येथील वि.प्र.मं.

च्या वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेचे संचालक आहेत. या सत्रात भारतीय ज्ञान प्रणाली या विषयाचे नाव बदलून स्वदेशी ज्ञान (indigenous knowledge system) करायचे का, तसेच भारतीय ज्ञान प्रणालीतील अभ्यासक्रमात 'महिलांच्या योगदानाबद्दल देखील उल्लेख करणे' या विषयांवर चर्चा झाली. तसेच 'आजच्या काळात विद्यार्थी ज्ञानासाठी नव्हे तर रोजगाराच्या दृष्टीने मूल्यवर्धित अभ्यासक्रम शिकतात' या विषयावर चर्चा झाली. या विषयावर प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी देखील त्यांचे मत मांडले. यानंतर काही प्रेक्षकांनी प्रश्न विचारले व पॅनलिस्टनी उत्तरे दिली. या नंतर महाविद्यालयातील उपाहारगृहातील जेवणाचा सर्वांनी आस्वाद घेतला.

यानंतर प्लेनरी सेशन - २ चा आरंभ झाला. यात डॉ. सुचिता सावंत प्रमुख वक्ता होत्या. 'प्रसादरूपी सणांना पाळली जाणारी आयुर्वेदिक खाद्यपद्धत- आयुर्वेदिक दृष्टीकोन' या विषयावर भाष्य केले. यात त्यांनी 'ऋतूनुसार खाद्य खाण्याचं महत्त्व व तसेच प्रत्येक सणामागचं शास्त्र व सणाला खाल्ल्या जाणाऱ्या प्रसादामागचं शास्त्र' सांगितलं. तसेच त्यांनी 'आयुर्वेदिक औषध पद्धत व त्रिदोष' याबद्दल माहिती सांगितली. त्यांनी सांगितलेल्या गोष्टींचे जर आपण पालन केले तर नक्कीच आपण निरोगी आयुष्य जगू शकू यात काहीच शंका नाही. हा प्लेनरी सेशन डॉ. सोनाली पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्या मुलुंड मधील एम. सी. सी महाविद्यालयाच्या प्राचार्या आहेत.

या परिषदेतील टेक्निकल सत्रामध्ये विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांनी यांनी, 'भारतातील प्राचीन ते समकालीन ज्ञान आणि शिक्षण प्रणालींचा विकास' या विषयावर त्यांचे शोधनिबंध सादर केले. शोधनिबंधांचं सादरीकरण कॉन्फरन्सरूम, कत्यायन सभागृह व संगणक खोलीत झाले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. प्रिता निलेश, डॉ.वैशाली दाबके, डॉ.पल्लवी नलावडे होते. डॉ.प्रिता निलेश वझे केळकर महाविद्यालयाच्या प्राचार्या आहेत. डॉ. वैशाली दाबके रामनारायण रुईया महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाच्या प्रमुख आहेत. डॉ. पल्लवी नलावडे या सोमैया विद्याविहार विद्यापीठातील के. जे. सोमैया धर्म अभ्यास संस्थेतील बौद्ध अभ्यास केंद्रात सहाय्य प्राध्यापिका व प्रमुख आहेत.

यानंतर समारोप कार्यक्रमाचा आरंभ झाला. डॉ.अरविंद जामखेडकर हे समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. त्यांनी आजच्या दिवसभरात जी चर्चा झाली त्याचे सार सांगितले व हडप्पा, मोहेंजोडारो व वैदिक संस्कृती बद्दल सांगितले. तसेच त्यांनी 'आर्य नक्की कुठले?' यावर ही मत मांडले. तसेच त्यांनी शंकराचार्य, कौटिल्य अर्थशास्त्र, बौद्ध धर्म, भारतीय संस्कृती व भाषा या विषयांवर विस्तृत विवेचन केले. तसेच ते भारतीय संस्कृती व ग्रीक संस्कृती, युरोपीय संस्कृती यातील फरक यावर ही बोलले. या कार्यक्रमाच्या समारोप समारंभाचे सूत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयिका अंजली पुरंदरे यांनी केले. त्यानंतर संस्कृत विभाग प्रमुख स्वाती भालेराव यांनी उत्तम आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाचा समारोप आनंदाने पसायदानाने झाला. हा कार्यक्रम भगिनी संस्थांचे प्राचार्य लॉ महाविद्यालय श्रीविद्या आणि बांदोडकरचे प्राचार्य विद्या मोहदया यांच्या उपस्थितीत झाला. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्य महेश पाटील, उपप्राचार्य प्रियमवडा टोकेकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य छाया कोरे, समन्वयिका अंजली पुरंदरे, डॉ. इंद्रायणी रॉय, स्वाती भालेराव, अक्षता शेनोय, श्रेया मोघे व स्वयंसेवकांनी संपूर्ण वर्ष यासाठी मेहेनत केली ज्यामुळे ही परिषद सुफळ संपूर्ण झाली.

दि. ७ जानेवारी २०२४ रोजी गंधर्व सांस्कृतिक समितीने माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन केले

होते. या मेळाव्यात एकूण ११३ माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यात माजी विद्यार्थ्यांनी संगीत आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले आणि गप्पा-गोष्टींचा कार्यक्रम रंगविला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी ब्लू टूथ माईक गंधर्व समितीला बक्षीस स्वरूपात दिला.

दिनांक ९ जानेवारी रोजी विवेकानंद स्टडी सर्कल समिती, तत्त्वज्ञान विभाग आणि बीएमएस विभागातर्फे रामकृष्ण मिशन मठ सकवार येथे विद्यार्थ्यांची भेट घडविण्यात आली. तेथे विद्यार्थांना सर्व प्रकल्पांची व्यवस्थित माहिती देण्यात आली.

दिनांक ९ जानेवारी रोजी हिंदी विभाग आणि हिंदुस्थानी प्रचार सभा याच्या संयुक्त विद्यमाने भाषण प्रतियोगिता आयोजित करण्यात आली होती.

प्रो. सुभाष शिंदे - उपप्राचार्य एवं कार्यक्रम अध्यक्ष

डॉ. रीता कुमार - निदेशक हिंदुस्तानी प्रचार

डॉ. उषा मिश्रा - प्रतियोगिता निर्णायक

डॉ. अर्चना दुबे - प्रतियोगिता निर्णायक

**विजयी विद्यार्थी -**

प्रथम (३००० रुपये) - रजनीश रमेश मिश्रा

द्वितीय (२००० रुपये) - अंश धमेंद्र राय

तृतीय (१५०० रुपये) - खुशबू जितेंद्र यादव

प्रोत्साहन (१००० रुपये) - निशांक दुबे

प्रोत्साहन (१००० रुपये) - सपनाकुमारी झा

दिनांक ९ जानेवारी रोजी बीएएमएमसी विभागातर्फे नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा आणि फिल्म्स डिव्हिजन एक शैक्षणिक सहल म्हणून काम करते आहे. जे भारतीय सिनेमाचा इतिहास, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक प्रभावाविषयी अंतर्दृष्टी देते. हे इंडस्ट्री एक्सपोजर प्रदान करते, सहभागींना सिनेमाचा वारसा जपण्यात संग्रहालयाची भूमिका आणि चित्रपट संस्कृतीला चालना देण्यासाठी योगदान समजून घेण्यास सक्षम करते. या भेटीमुळे नेटवर्किंगच्या संधी, अभ्यागतांना उद्योग व्यावसायिकांशी जोडणे आणि संभाव्य करिअर मार्ग दाखवणे सुलभ होईल. याव्यतिरिक्त, हे संशोधनास प्रेरणा देणारे ठरू शकेल. सर्जनशील प्रकल्पांसाठी माहितीचा समृद्ध स्रोत प्रदान करणारे आणि चित्रपट निर्मिती तंत्रांची व्यावहारिक समज प्रदान करणारे ठरले.. एकूणच, भारतीय चित्रपट उद्योगाच्या गतिशील लँडस्केपमध्ये वास्तविक जगाच्या प्रदर्शनासह सिद्धांत विलीन करून, ही एक व्यापक अनुभवात्मक शिक्षणाची संधी उपलब्ध होऊ शकतील. तसेच तिथे विद्यार्थ्यांना विविध आधुनिक उपकरणे, सिनेमा कसा तयार होतो इत्यादी अनेक बाबींची सविस्तर माहिती देण्यात आली.

VPM's K.G Joshi College of Arts and N.G. Bedekar College of Commerce (Autonomous), Thane मध्ये B.Voc and Skill development and Entrepreneurship cell च्या Skill development and Entrepreneurship cell ने camp on chief minister employment generation program awareness दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी एकूण ११६ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आयोजित केला.

ह्या उपक्रमाचा उद्देश एकंदरीतच उद्योग कसा उभारावा हे होते. ज्यामध्ये, उद्योगासाठी चे कर्ज उभारणे, प्रकल्प निवड, बाजार सर्वेक्षण इ. चा समावेश होता.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम अभ्यासक्रमाच्या बँकिंग आणि विमा विभागातर्फे बँकिंग विमा आणि गुंतवणुकीच्या मूलभूत गोष्टी विषयाचा पंधरा दिवसीय अभ्यासक्रम. दिनांक ११ डिसेंबर २३ ते ८ जानेवारी २४ या कालावधीत आयोजित करण्यात

आला होता. एकूण ४५ विद्यार्थी यात सहभागी झाले. श्री. राजेश सेतुरामन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम अभ्यासक्रमाच्या बँकिंग आणि विमा विभागातर्फे BSE आणि RBI या आस्थापनांना औद्योगिक दृष्टीकोनातून दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी भेट देण्यात आली. एकूण १०८ विद्यार्थी यात सहभागी झाले. विद्यार्थ्यांना भविष्याच्या, करिअर दृष्टीकोनातून व्यावसायिक संधी उपलब्ध होण्यासाठी प्रोत्साहन देणे यातून सदर भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम अभ्यासक्रमाच्या फायनानशियल मार्केट्स विभागातर्फे FYBFM च्या विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. Multi commodity Exchange of India Limited (MCX) planet Hollywood Thane येथे नेण्यात आले होते. एकूण ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम अभ्यासक्रमाच्या फायनानशियल मार्केट्स विभागातर्फे SYBFM च्या विद्यार्थ्यांसाठी SEBI कार्यालय मुंबई येथे दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. सदर भेटीच्या वेळी श्री. राहुल केळापुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात एकूण ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या BAMMC विभागातर्फे FYBAMMC इंग्रजी आणि मराठी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय चित्रपट आणि चित्रपट विभागाचे राष्ट्रीय संग्रहालय, मुंबई येथे दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण १०८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या NEP अंमलबजावणी सेलतर्फे NEP २०२० धोरण अंमलबजावणी अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन दिनांक १६ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, उपकुलगुरू डॉ.अजय भामरे, प्रभारी डीन कॉमर्स आणि मॅनेजमेंट डॉ.कविता लघाटे प्राचार्या आणि NEP २०२० टास्क फोर्सच्या सदस्या डॉ. सुचित्रा नाईक, श्री.संजय जगताप सहसंचालक पनवेल विभाग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, यात ९९ पदवी महाविद्यालय, २९९ कनिष्ठ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. तर एकूण ३९३ शिक्षक सहभागी झाले.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम अभ्यासक्रमाच्या लेखा आणि वित्त विभागातर्फे बँकिंग क्षेत्रातील 'वाढ आणि संधी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी श्री. दीनानाथ म्हात्रे, सहाय्यक महाव्यवस्थापक, जी.पी.पारसिक बँक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानाला ६९ विद्यार्थी उपस्थित होते.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे मराठी विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे सेतू विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २३ आणि २४ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हाधिकारी श्री. गोपीनाथ ठोंबरे, नायब तहसीलदार श्री.विठ्ठल दळवी, प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिनांक २३ जानेवारी रोजी १३८ विद्यार्थी तर २४ जानेवारी रोजी १५३ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी काव्यवाचन, काव्यलेखन, गीत गायन वैयक्तिक आणि सामूहिक, स्टँडअप कॉमेडी वाद्य वादन अशा विविध

स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुस्तक प्रकाशन विषयावर प्रा.प्रज्ञा पंडित यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

जोशी- बेडेकर महाविद्यालयाचे मराठी विभागातर्फे प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने दत्तक घेतलेले गाव उंबरमाळी-कसारा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी तेथील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, समूहगीत गायन, एकल गायन, संभाषण कौशल्य, कविता पठण, वक्तृत्व स्पर्धा, मेमरी स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे ११ स्वयंसेवक विद्यार्थी आणि मराठी विभाग, प्राध्यापक यांवेळी उपस्थित होते.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम अभ्यासक्रमाच्या लेखा आणि वित्त विभागातर्फे TYBCOM वर्गातील विद्यार्थ्यासाठी दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई पोर्ट ट्रस्टच्या श्री.कुलकर्णी आणि बग्गा यांनी विद्यार्ध्याना मार्गदर्शन केले. यावेळी एकूण १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या B.VOC आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता सेल यांच्यातर्फे दिनांक २५ जानेवारी २४ रोजी 'बारावी कॉमर्स नंतर करीयरच्या संधी' या विषयावर तज्ज्ञ व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. जिया शेख यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी एकूण १७५ विद्यार्थी उपस्थित होते.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या बी.कॉम विभागातर्फे TYBCOM विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी केंद्रित अनुभवी शिक्षण देण्याच्या अनुषंगाने महाविद्यालय परिसर आणि तेथील योगकुटीर याना दिनांक १६ आणि १८ जानेवारी २०२४ रोजी भेट देण्यात आली. यावेळी ३२ विद्यार्थी उपस्थित होते.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या टॅलेंट आणि कल्चरल समितीच्या मदतीने RYLA २४ (युवा नेतृत्व पुरस्कार) आयोजन दिनांक २७ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी गिजा भट्टाचार्य आणि सुदीप श्रीवास्तव यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमात ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या ग्रीन-क्लब समितीच्या वतीने पर्यावरण कायदे आणि लोकसहभाग या विषयावर मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी श्री.रोहित जोशी, अध्यक्ष संस्थापक, येऊर पर्यावरण समिती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. महेश बेडेकर आणि प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक उपस्थित होते. यावेळी २४४ विद्यार्थी उपस्थित होते.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे शहीद दिन- महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त बलिदानाचे स्मरण दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. यात एकूण १६ विद्यार्थी सहभागी झाले.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या B.VOC आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता सेल यांच्यातर्फे दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी एथिकल हॅकिंग आणि सायबर सिक्युरिटी या विषयावर प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. श्री.अजय निकुंभ- सायबर सुरक्षा तज्ज्ञ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी १५८ विद्यार्थी उपस्थित होते.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### संख्याशास्त्र विभाग

दि.०६.०१.२०२४ रोजी संख्याशास्त्र विभागातर्फे 'Industrial Application of Statistical Process Control' या विषयावर डॉ शिल्पा खरे, सहाय्यक प्राध्यापक, महर्षी दयानंद महाविद्यालय, परेल यांचे व्याख्यान महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला एकूण ५२ विद्यार्थी व ४ प्राध्यापक उपस्थित होते.





दि. २० जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयाच्या ‘संख्या क्लब’ आणि ‘हायकिंग आणि ऍडव्हेंचर क्लब’तर्फे माथेरान येथे ट्रेकिंग आयोजित करण्यात आले होते.. यावेळी एकूण ५३ विद्यार्थी व ६ प्राध्यापक उपस्थित होते.






### वनस्पतीशास्त्र विभाग

दि.०२ नोव्हेंबर २०२३ रोजी वनस्पतीशास्त्र विभागातर्फे कृषी विज्ञान केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे अभ्यास भेट देण्यात आली. विभागप्रमुख डॉ. विनोद जमदाडे, डॉ. मोहन गलांडे, डॉ. रुपाली गायकवाड व डॉ. विशाखा विचारे हा शिक्षकवृंद विद्यार्थ्यांसमवेत उपस्थित होता. यावेळी एकूण ३७ विद्यार्थी व २ प्राध्यापक उपस्थित होते.



### ग्रंथालय विभाग

दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी जिजाऊ मासाहेब जयंती, तसेच स्वामी विवेकानंद जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्यावरील माहितीचे, तसेच पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.




श्रद्धेच्या जोरावर असाध्य गोष्टी साध्य करता येतात...

दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती, तसेच बाळासाहेब ठाकरे जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. डॉ. वीणा ठाकरे, तसेच डॉ. भूपेंद्र बनसोड (तज्ज्ञ मार्गदर्शक एम.लिब.) तसेच श्री. नारायण बारसे, ग्रंथपाल जोशी बेडेकर महाविद्यालय यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्यावरील माहितीचे, तसेच पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच यांच्यावरील माहितीचे, तसेच पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.




**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**पुस्तक प्रकाशन**

- आमच्या महाविद्यालयातील व्हिजिटिंग फॅकल्टी ॲड. ए.जी. गद्रे यांनी त्यांचे बँकिंग कायद्यावरील पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकाचा तपशील पुढीलप्रमाणे:



लेखक : ॲड. अनंत गद्रे
प्रकाशन वर्ष : २०२४
प्रकाशक : मुकुंद प्रकाशन

- २ जानेवारी २०२४ रोजी सेमिस्टर-VI च्या विद्यार्थ्यांकरिता अभिमुखता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे आणि अभ्यासक्रमाच्या परिणाम अंतर्गत मूल्यमापन आणि डीपीसी III याविषयी तारखांसह पूर्ण आणि अंतिम सूचना ह्या वेळी विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

**सावित्रीबाई फुले जयंती**

बुधवार, ३ जानेवारी २०२४ रोजी, महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या.

भारतीय परंपरेचे पालन करून कार्यक्रमाची सुरुवात डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर द्वितीय वर्ष विधीची विद्यार्थिनी गायत्री चौधरी यांनी सरस्वती वंदना गायली. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राध्यापक हेतल मेशारी ह्यांनी डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे सुरुवातीचे भाषण श्री. शैलेश लाटकर यांनी केले. कु. मनीषा झिटे (सदस्य महिला विकास सेल टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे) हिने मोनो ॲक्टतर कु. गायत्री चौधरी यांनी एक कविता सादर केली. त्या दिवशी वक्तृत्व स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे:-

१. मला मुलगी असल्याचा अभिमान आहे.

२. माझ्या आयुष्यातील सर्वात प्रभावशाली महिला

**विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे:-**

१. श्री प्रतीक जगताप (तृतीय वर्ष विधी : प्रथम क्रमांक )

२. कु. किरण सिहाग द्वितीय वर्ष विधी : द्वितीय क्रमांक)

३. कु. मनीषा झिटे (तृतीय वर्ष विधी) आणि कु. मयुरी कोलन (प्रथम वर्ष विधी) तृतीय क्रमांक

कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात पुढे जात असताना प्रा. विनोद वाघ यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले आणि महिला सक्षमीकरणाबाबत सक्रिय होण्यास सांगितले. त्यानंतर डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी 'अनेक अडथळ्यांना न जुमानता महिला आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत, पण अजून बऱ्याच गोष्टी करायच्या आहेत' असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना दिला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभारप्रदर्शन प्रथम वर्ष विधीची विद्यार्थिनी कुमारी ज्ञानेश्वरी शिंदे हिने केले.



- आमचे पूर्ण वेळ प्राध्यापक श्री. विनोद एच. वाघ हे १५ जानेवारी २०२४ रोजी त्यांच्या CAS पदोन्नतीसाठी स्टेज १ वरून स्टेज २ पर्यंत छाननी आणि मूल्यमापन समितीसमोर हजर झाले. समितीने २०१९ पासून त्यांच्या पदोन्नतीची शिफारस केली आहे.
- प्रवेश नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी २०२३-२४ साठी प्रथम वर्ष एलएलबीच्या सर्व प्रवेशांना मान्यता दिली आहे. त्या संबंधीची मंजुरी महाविद्यालयास मिळाली आहे.
- बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या परिपत्रकानुसार ५०,०००/- फी भरून ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.
- आमच्या महाविद्यालयाने विद्या प्रसारक मंडळाच्या च्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालय सोबत 'पर्यावरणाचे कायदेशीर संरक्षण आणि सुधारणा: आव्हाने आणि मार्ग' या विषयावरील राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आमच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे आणि १,००,०००/- रुपयांचे प्रायोजकत्व मंजूर केले आहे.

**राज्य क्रीडा दिन :**

कुस्तीगीर खाशाबा यांच्या जयंतीनिमित्त जानेवारी हा 'राज्य क्रीडा दिन' म्हणून साजरा केला जातो. १९५२ मध्ये ऑलिम्पिकमध्ये स्वतंत्र पदक जिंकणारे पहिले भारतीय खाशाबा जाधव. त्यांच्या जयंतीनिमित्त १५ जानेवारी हा 'राज्य क्रीडा दिन' म्हणून साजरा केला जातो. म्हणूनच, VPM च्या TMC लॉ कॉलेज ठाणे व महाविद्यालयातील प्रांगणात असलेल्या सर्व महाविद्यालयांसाठी बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले. दिनांक १५ आणि १६ जानेवारी २०२४ रोजी सदर

स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सहभाग घेणाऱ्या महाविद्यालयांची नावे व त्यांना देण्यात आलेले कोड खालील प्रमाणे:

१. व्ही.पी.एम.चे बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) - (संघ - अ)

२. डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (ब्रिम्स) - (टीम - बी)

३. व्हीपीएम'चे के. जी. जोशी कला महाविद्यालय आणि एन. जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त) (संघ - क)

४. विप्रमंचे ठामपा विधी महाविद्यालय ठाणे - (टीम - डी)

५. विद्या प्रसारक मंडळाचे पॉलिटेक्निक - टीम ई (बायस)

सकाळी ११.०० वाजता संघांमध्ये चिठ्ठ्या काढण्यात आल्या, त्यानुसार संघांच्या पुढीलप्रमाणे जोड्या करण्यात आल्या, संघ अ विरुद्ध संघ क आणि संघ ब विरुद्ध संघ ड. विद्या प्रसारक मंडळाचे पॉलिटेक्निक महाविद्यालय थेट उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. सामना सकाळी ११.३० वाजता सुरू झाला ज्यासाठी श्री साई स्पोर्ट्स क्लब, ठाणे येथील श्री रोहन आणि श्री तुषार यांना पंच म्हणून बोलावण्यात आले. त्याचबरोबर टर्फच्या प्रत्येक चौकोनावर दोन सामने खेळवले गेले. (A v/s C, B v/s D) त्यानुसार 'टीम C' आणि 'टीम D' ने पहिली फेरी जिंकली.

उपांत्य फेरीसाठी तीन संघ पात्र ठरले ते म्हणजे संघ 'C', संघ 'D' आणि संघ 'E' (पॉलिटेक्निक कॉलेज) चौथ्या संघाच्या जागेसाठी 'अ' आणि संघ 'ब' यांच्यात पात्रता सामना खेळला गेला. 'अ' संघाने क्वालिफायर सामना जिंकला.

उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी संघ 'C', संघ 'D' आणि उपांत्य फेरीसाठी टीम 'E' (पॉलिटेक्निक कॉलेज) यांच्यात पुन्हा चिठ्ठ्या काढण्यात आल्या, त्यानुसार संघ बाय (पॉलिटेक्निक कॉलेज) आणि संघ 'C' उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला आणि संघ 'D' ला उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी बाय देण्यात आला.

उपांत्य फेरीत आमचे एकूण ४ संघ होते. टीम 'E' (पॉलिटेक्निक कॉलेज) वि/स्टीम 'C' आणि टीम 'D' विरुद्ध/s टीम 'A'. टीम 'C' प्रथम फायनल टीम म्हणून पात्र ठरली आणि टीम 'D' दुसरी फायनलिस्ट टीम म्हणून पात्र ठरली. सेमीफायनल फेरीनंतर रिफ्रेशमेंट होते VPM् च्या TMC लॉ कॉलेजने सर्व संघ आणि स्वयंसेवकांसाठी रिफ्रेशमेंटची व्यवस्था केली होती.

विद्या प्रसारक मंडळाचे के.जी. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त) (टीम - 'C') विरुद्ध व्हीपीएमचे टीएमसी लॉ कॉलेज ठाणे, (टीम - 'D') ह्यांच्यात अंतिम सामना झाला आणि विद्या प्रसारक मंडळाचे के.जी. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त) (टीम - 'C') ने 'खाशाबा जाधव क्रिकेट स्पर्धा' जिंकली.

व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेज ठाणे म्हणजेच टीम 'D' ला उपविजेता संघ ट्रॉफी देण्यात आली; व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेज ठाण्याच्या एलएलबीच्या तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री. सूरज कढणे ने स्पर्धेत सर्वाधिक धावा केल्याबद्दल 'मॅन ऑफ द टूर्नामेंट ट्रॉफी' जिंकली. सर्व सहभागी महाविद्यालयांनी VPM च्या TMC लॉ कॉलेज, ठाणे आयोजित खाशाबा जाधव क्रिकेट स्पर्धेच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.



- **अल्पसंख्याक अधिकार दिवस साजरा**

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाने दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी 'अल्पसंख्याक अधिकार दिवस' साजरा केला. यावेळी प्रा. विनोद एच वाघ यांनी संविधानाअंतर्गत असलेल्या अल्पसंख्याकांच्या अधिकाराची पार्श्वभूमी स्पष्ट केली व धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याक यांचे अधिकार सांगितले. यावेळेस भाषिक अल्पसंख्याक यांच्याविषयी चर्चा झाली. कार्यक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्रात स्थायिक असलेल्या अनेक अमराठी भाषिकांनी त्यांच्या मातृभाषेतून त्यांचे मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र राज्यात, तसेच न्यायालयात मराठी भाषेचे असलेले महत्त्वही यावेळी चर्चेला आले. प्रा. हेतल मिशेरी, प्रा. अंबर जोशी यांनी यावेळी त्यांचे मनोगत मांडले. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, मैथिली, गुजराती, तेलगू या भाषेत भाष्य केले. बंजारा, मालवणी या भाषेतून काहींनी मनोगत व्यक्त केले. संविधानाने भाषिक अल्पसंख्याकास दिलेल्या विविध पैलूंचीही चर्चा करण्यात आली.

- **२६ जानेवारी : ध्वजारोहण आणि सांस्कृतिक कार्यक्रम**

प्रजासत्ताक दिनी आमच्या कॅम्पसमध्ये सकाळी ८ वाजता विद्या प्रसारक मंडळाचे सहसचिव श्री उत्तम जोशी यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रध्वज नेहमीच्या उत्साहात फडकवण्यात आला. त्यानंतर लगेचच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. व्हीपीएम संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पूर्ण उत्साहाने सहभाग घेतला. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'आमचा ध्वज, आमचा अभिमान' या शीर्षका अंतर्गत नागरिकांच्या ध्वजसंहितेची कर्तव्ये समोर आणणारे नाटक सादर केले.

- **विद्यापीठ तज्ज्ञ समितीची भेट :**

विद्यापीठाकडे महाविद्यालयाने केलेल्या एलएलएम आणि एलएलबी (३ वर्षे) अतिरिक्त तुकडीच्या अर्जा संबंधी पडताळणी साठी विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने महाविद्यालयास २९ जानेवारी २०२४ रोजी भेट दिली. तीन सदस्यांच्या ह्या समिती मध्ये डॉ. अस्मिता वैद्य (प्राचार्या जीएलसी विधी महाविद्यालय), डॉ. शिवानी शेलार (प्रभारी प्राचार्य न्यू लॉ कॉलेज) डॉ. किरण शर्मा (के सी लॉ कॉलेज उपप्राचार्य) ह्यांचा समावेश होता. डॉ. सुधाकर आगरकर हे विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने उपस्थित होते. समितीने विद्यापीठाला अनुकूल अहवाल दिला आहे.



तुलना करावी, पण अवहेलना करू नये.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२४**

विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतन ठाणे येथील ग्रंथालय आणि माहिती केंद्र मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा.

राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा १४ ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येतो.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ग्रंथालय आणि माहिती केंद्र मध्ये 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवडा दिनांक २४/०१/२०२४ आणि २५/०१/२०२४ या रोजी साजरा करण्यात आला. दिनांक २४/०१/२०२४ रोजी मराठी ग्रंथ संग्रहाचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.तसेच दिनांक २५/०१/२०२४ रोजी मराठी काव्य-वाचन करण्यात आले. या मध्ये विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी स्वतःहा कविता लिहून त्याचे उत्तम सादरीकरण केले. यावरून विद्यार्थ्यांना असलेले मराठी भाषे विषयी प्रेम, आपुलकी आणि अभिमान दिसून आला. प्रदर्शनात ठेवलेले अनेक ग्रंथ विद्यार्थ्यांनी वाचनास मागणी केली आणि या संदर्भात आपला अभिप्राय नोंदविला.





दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी Pillai College of Engineering and Technology (स्वायत्त), मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन व इनोव्हेशन सेल (अखिल भारतीय तंत्र शिक्षण विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने '19th Institution Council Regional trees.' चे आयोजन केले होते.

युक्ती इनोव्हेशन/स्टार्ट अप, उद्योजक, विविध संस्थां-तील शिक्षक वर्गाने या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला प्रोफेसर अनिल सहस्रबुद्धे (Chairman NEFT, Chairman EC - NAAC and NBA) उपस्थित होते. प्रोफेसर जगदिश बाकल, श्री. दिपन साहू, श्री. रवींद्र कुमार, डॉ. विनोद मोहितकर (Director DTE), प्रो. कारभारी विश्वनाथ काळे या विदुषीनी स्वागतोपर भाषण केले.





कार्यक्रमात वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन केले. कार्यक्रमाची सांगता Best Innovators व IIC Poster च्या विजेत्यांचा सत्कार करून झाली. या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य इनोव्हेशन, उद्योगाविषयी जागृती उपस्थितांमध्ये करणे होता. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील सौ. गौतमी पुजारे, सौ. स्मिता खंडागळे, सौ. अर्चना कालिया व सौ. ऋजुता कांबळी यांनी सहभाग घेतला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

३ जानेवारी : डॉ. कांचन आणि डॉ. श्रीपाद बापट यांनी लिहिलेला, व्हेन मॅनपॉवर प्लॅनिंग गोज अनप्लॅन्ड या शीर्षकाचा शोधनिबंध 'जर्नल ऑफ सोशल सायन्सेस' या युजीसी केअर ग्रुप १ नियतकालिकामध्ये, प्रकाशित झाला.

४ जानेवारी : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. विभूती सावे यांनी जर्नल क्लबमध्ये ऍन्युअल स्पिचेस ऑफ एशियन पेंट्स लिमिटेड या विषयावर सादरीकरण केले.




६ जानेवारी : डॉ. नीतिन जोशी यांना जोशी बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या इंडियन नॉलेज अँड एजुकेशन : इस्ट्स अप्लिकेशन इन कॉन्टेम्परारी टाइम्स इन कॉन्टेक्स विथ एन.इ.पी. या विषयावरील राष्ट्रीय परिषदेसाठी चर्चा सत्राचे समन्वयक म्हणून आमंत्रित करण्यात आले.

११ जानेवारी : डॉ. कांचन आणि सहा. प्रा.सिद्धेश सोमण यांना सस्मिरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजतर्फे त्यांच्या एमएमएस विद्यार्थ्यांच्या SIP अहवालांचे आणि मुलाखतीचे मूल्यमापन करण्यासाठी समीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१२ जानेवारी : डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे पाणिनी सभागृहात स्वरांजलीचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी  हौशी आणि निपुण कलाकार शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मिळून या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला आणि आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. जुन्या नव्या गाण्यांचे गायन, गिटार वादन, युकलेली वादन, तबला वादन, तालाची जुगलबंदी असे अनेकाविध सांगीतिक कार्यक्रम या वेळी सादर करण्यात आले. विद्यार्थी विकास समितीने या कार्यक्रमाचे आयोजन केले.





१५ जानेवारी : सहा. प्रा. कृष्णकांत लसुणे, यांनी १२ ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात आयोजित १६ व्या आविष्कार: महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ संशोधन अधिवेशनातील स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला.




१८ जानेवारी : डॉ स्मिता जपे यांनी विद्यार्थिनी आणि महिला कर्मचारी / प्राध्यापक सदस्यांसाठी 'जीवन चक्राच्या सर्व टप्प्यांवर महिलांचे आरोग्य' या विषयावर वैद्यकीय व्यावसायिक डॉ. स्नेहल कोहळे यांचे एक सत्र आयोजित केले.





२० जानेवारी : डॉ. पंकज नांदूरकर यांना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, तर्फे पुणे येथील एज्युकेशनल मल्टीमीडिया रिसर्च सेंटर (EMMRC) तर्फे कंटेंट डेव्हलपमेंट आणि व्याख्यानांच्या स्टुडिओ रेकॉर्डिंगसाठी आमंत्रित करण्यात आले.

ही व्याख्याने MOOC तुलनात्मक लोक प्रशासन, या अभ्यासक्रमाचा भाग असतील, जो भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत स्वयंम प्लॅटफॉर्मवर ऑनलाइन चालवला जाईल.

२१ जानेवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी टाटा मुंबई मॅरेथॉन तर्फे आयोजित हाफ मॅरेथॉन शर्यती मध्ये भाग घेतला आणि ही स्पर्धा २ तास २६ मिनिटांत यशस्वीपणे पूर्ण केली. दृढनिश्चय, इच्छाशक्ती, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्न तुम्हाला अगदी कठीण उद्दिष्टे साध्य करण्यात मदत करू शकतात.




२५ जानेवारी : डॉ. व्हीएन ब्रिम्स लायब्ररी तर्फे जनरल मॅनेजमेंट या विषयावर पुस्तक प्रदर्शन भरवण्यात आले, या प्रदर्शनाचे उद्घाटन एमएमएस-२०२३-२४ तुकडीच्या प्रथम वर्षाच्या, चाणक्य, पराशर आणि वशिष्ठ विभागाच्या विद्याथी प्रतिनिधींच्या हस्ते कारण्यात आले. ४०० हून अधिक जनरल मॅनेजमेंट या विषयावरील शीर्षके या वेळी प्रदर्शित करण्यात आली. सर्व विभागातील प्राध्यापक सदस्य, शिक्षकेतर कर्मचारी सदस्य आणि विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या संग्रहाची ओळख करून देणे या मुख्य उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस हे प्रदर्शन सुरू ठेवण्यात आले.



२६ जानेवारी : महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी तर्फे राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना ठोस स्वरूप देण्यासाठी. आयोजित केलेल्या महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज या उपक्रमाचे १५ जुलै २०२३ रोजी अनावरण करण्यात आले. या उपक्रमात राज्यातील शैक्षणिक संस्थांसारख्या एकूण २१७२ संस्थांनी सहभाग घेतला, ज्या अंतर्गत ९२२७ नवउद्योजकांनी आपला सहभाग नोंदवला आणि त्यातून डॉ व्ही एन ब्रिम्स मधील सर्वोत्कृष्ट २ संघ निवडले गेले.

संघ १ चे नेतृत्व एम एम एस चा विद्यार्थी साहिल उत्तेकर याने केले होते. तर संघ २ चे नेतृत्व एमएमएस ची विद्यार्थिनी फिजा आगा हिने केले होते. (संघ २- सदस्य विद्यार्थी तेजस सारंग आणि गणेश सोळुंके)

Acrobat Document

ठाणे जिल्हा स्तरावर १७ संघांमध्ये स्पर्धा करत या १७ संघांमधून, सर्वोत्कृष्ट १० विजेते, सादरीकरण सत्रातून निवडले गेले.

ब्रिम्सच्या आय.आय.सी. समितीला हे सांगताना खूप आनंद होत आहे की सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांमध्ये फिजा आगा चे नेतृत्व असलेल्या आमच्या संघ २ ची निवड झाली. या संघाला डॉ. पंकज नांदूरकर यांनी मार्गदर्शन केले होते. या संघाचा २६.०१.२०२४ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे सत्कार करण्यात आला आणि प्रत्येक विजेत्या संघाला रु. १ लाख बीज भांडवल प्रदान करण्यात आले.



२९ जानेवारी : डॉ. व्ही. एन. ब्रीम्स तर्फे विद्यार्थ्यांसाठी डहाणू येथील अदानी थर्मल पॉवर स्टेशनला औद्योगिक क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले. डॉ. नीतिन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. एकूण ४४ विद्यार्थ्यांनी ह्या औद्योगिक क्षेत्राला भेट दिली.




३१ जानेवारी : सहा. प्रा. कृष्णकांत लसुणे यांनी यूजीसी केअर जर्नल्समध्ये ४ शोधनिबंध प्रकाशित केले.


URBAN INDIA

Certificate of Publication

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा

❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण

❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.